# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००० |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३४**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष चौथे / अंक ८ / फेब्रुवारी २०००

## संपादकीय

### प्रजासत्ताकाची पन्नाशी

यंदा २६ जानेवारीला आपल्या प्रजासत्ताकाला ५० वर्षे पुरी झाली, म्हणजे भारताची घटना स्वीकारून आपल्याला यंदा ५० वर्षे झाली. घटना स्वीकारल्यावर लगेच पहिली सार्वत्रिक निवडणूक होऊन घटनेप्रमाणे लोकसभा अस्तित्वात आली. घटनेची प्रतिज्ञा आपल्या सर्वांना पाठ असावयास हवी पण ती शाळेतल्या मुलाशिवाय त्यांच्या किती पालकांना पाठ असेल याची मला शंकाच आहे. प्रतिज्ञेची सुरुवात आहे 'भारत माझा देश आहे.' त्याच्या पुढीची ओळ आहे, 'सारे भारतीय माझे बांधव आहेत.' ही पहिली दोन वाक्ये तनमनधनाने पाळणारे किती भ रतीय आहेत? तसेच "माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन." यातली पहिली ओळ कदाचित बऱ्याच भारतीयांच्या बाबतीत खरी असेल कारण प्रत्येक भारतीय हा परंपरावादी असतो. पण पाईक होण्याच्या पात्रतेचे काय! व त्यापुढील प्रतिज्ञेतील सर्वच मजकुराबद्दल फारच थोड्या भारतीयांना जाण असेल व कळकळ असेल. नाहीतर अशा प्रतिज्ञा घेऊन पहिल्या नंबराने परीक्षा पास होणारे विद्यार्थी पुढील आयुष्यात इतर देशात जाऊन स्थायिक कशाला झाले असते? एकूण, गेल्या ५० वर्षांत आम्ही आमच्या घटनेबद्दल फारच उदासीन आहोत. व तिच्यात अंतर्भूत असलेल्या कलमांच्या विरुद्धच कृती करण्याची सवय भारतीयांना जडली आहे. याबाबत सुप्रीम कोर्टाच्या दोन ज्येष्ठ वकीलांचा दृष्टिकोन वाचनात आला. त्याचा आशय थोडक्यात असा. त्याच्यातील पहिला पुरुष वकील आहे तर दुसरी महिला आहे. पुरुष वकिलाचे म्हणेण असे-

बार असोसिएशनच्या बोलाविलेल्या घटना समितीच्या (ज्यात राजकीय पक्ष, विवक्षित जाती/जमाती, मायनॉरिटीज, स्त्री संघटना, अराजकीय अधिकारी, न्यायमूर्ति, वकील यांचा भरणा होता) सदस्यांनी एकमुखाने निर्णय दिला की, भारतीय संघटनेत दोष नसून, दोष हे स्वीकारलेल्या लोकांमध्ये आहेत. भारतीय राजघटना ही कालानुरुप कसोटीस उतरली असून तिचा योग्य मान व वापर न केल्यास त नक्कीच सामाजिक न्याय, आर्थिक विषमता आणि सर्वसाधारण माणसाचे भले करुन या देशाततील जनतेचे नक्की कल्याण करील. त्यामुळे सध्या तरी तिच्यात बदल करणे म्हणजे आत्मघात करुन घेण्यासारखे आहे.

भारतीय संविधानातच वेळोवेळी सुधारणा करण्यास वाव ठेवला आहे. आणि त्यानुसार आतापर्यंत ऐंशीचे वर सुधारणा झाल्या आहेत आणि त्याप्रमाणे भूतकाळात आपण सुधारणा केल्या आहेत व भविष्यकाळातही करु शकू असे असताना संबंध घटना बदलण्याची जरुरी नाही. यादृष्टीने भारतीय घटना बदलावी की नाही याविषयी सार्वमत घेणे

जरुरीचे आहे. आणि एकदा सार्वमत झाले की घटना बदलणे अनिर्वाय आहे तर मग बील फिरुन बनविण्यासाठी कायदेतज्ञांची मदत जरुरीची आहे.

लोकशाही आणि त्यानुसार चालणाऱ्या संस्थांनी आता चांगलेच घट्ट पाय रोवले आहेत व म्हणूनच केंद्रात व राज्यात विविध पक्षांच्या मंत्रीमंडळांनी काम केले आहे आणि हेच त्याचे सबळ कारण आहे.

घटना बनविणाऱ्या त्यावेळेच्या राजकीय पुढाऱ्यांमुळे हे शक्य झाले आहे व मुक्त पत्रकारिता व स्वतंत्र न्यायव्यवस्था यांनी त्याला हातभार लावला आहे. आणि घटनेची ही शक्तीच इतर सामाजिक संस्थांना उभे रहाण्यास बळ देते. कायद्याची अजूनही काही ठिकाणी पायमल्ली होत असली तरी हे सर्व चित्र असे आहे. हे बदलावयाचे असेल तर शालेय जीवनातील प्रतिज्ञेशी प्रामाणिक राहणे आवश्यक आहे. पुढील शतकात असा प्रामाणिकपणा आपण आपल्यात ठेवला तरच निभाव लागेल. किंमत आहे त्याची बूज राखली जाते. आणि जरी अशिया आणि आफ्रिकेतील विकसनशील देशात लोकशाही नष्ट झाली आहे तरी भारतात ती अजून अस्तित्वातच नाही तर फोफावली आहे.

एवढे खरे की सामान्य माणसाचे जीवन म्हणावे तसे सुधारलेले नाही पण घटनेची जी मूलभूत तत्वे आहेत. जीवन, स्वातंत्र्य व समानता यामुळेच माणसाला स्वाभिमानाने जगण्याचे आणि राहणीमान सुधारण्याचे बाळकडू दिले आहे.

राज्यघटनेतील काही कलमे स्पष्ट नाहीत. त्यामुळे त्यांचा अर्थ लावताना अडचण होते व ही अशी काही कलमे भावनेशी निगडित असलेल्या प्रश्नांविषयी त्या त्या वेळच्या समाज धुरीणींनी समाजाला काळानुरुप योग्य मार्ग दाखवून त्या भावनांचा प्रक्षोभ न होता योग्य प्रकारे निर्णय घेऊन प्रश्न सोडविले जावेत हेच शहाणपण ती कलमे तशीच देण्यात असावे. कलमे १३,१४,३५६,१६३ ते १६७, १०२, १९१ ज्यामध्ये काळानुरुप बदलाचा विचार करणे जरुरीचे आहे. खरे म्हणजे ही कलमे निःसंदिग्ध आहेत. त्यातील बदलाचा विचार हा एक राजकीय वाद आहे. निरपेक्ष बुद्धीने विचार केल्यास राजकीय पुढाऱ्यांच्या चुकीच्या निर्णयांमुळे घडलेल्या घटना म्हणजे घटनेची चूक नसून ती राबविणाऱ्या लोकांची चूक आहे. महिला वकिलाचे मत असे होते की, सध्या राज्यातील स्थिती पाहता ती प्रथा मोडून काढली तरी चालण्यासारखे आहे. तसेच राज्यसभा आणि विधानसभा ज्यातील खासदार आमदार हे जनतेने निवडून दिलेले नसल्यामुळे त्यांना तसेच भाषिक प्रांतावर रचनेपेक्षा फिरुन एकदा भौगोलिक रचनेवर राज्य निर्माण करावयास पाहिजेत. म्हणजे भाषेचा किंवा पाणी वाटप प्रश्न गौण ठरुन निकालात निघतील.

राज्यातील मंत्रीमंडळे ही जास्तीत समाजाभिमुख व पारदर्शक झाल्यास व प्रत्येक तिजोरीत येणाऱ्या पैशाचा हिशोब ठेवल्यास भ्रष्टाचार दूर होईल. जनतेच्या कल्याण्याचा विचार केला पाहिजे. सदासर्वदा केंद्राकडे आ वासून बघणे सोडले पाहिजे. जागतिकिकरण, खाजगीकरण आणि मुक्त व्यापाऱ्यांच्या २१व्या शतकात लोकांच्या मताला अधिकार हवा. तो राज्यातील एका अधिकाऱ्याच्या अखत्यारीतील नसावा.

सर्वसाधारण लोकांच्या मते भारतीय घटनेच्या चौथ्या प्रकरणात अनुच्छेद ३६-५१ पर्यंत सरकारने पालन करावयाची नीती निर्देशक तत्वे सांगितली आहेत. सडक, परिवहन, बीज, शाळा, इस्पीतळे बाबतीत प्रगती केली आहे. तांदूळ, गव्हाचे उत्पादन वाढले आहे. उद्योगांच्या कारखान्यात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. आर्युमान २५ वरुन ६० वर गेले आहे. परंतु ग्रामोद्योगांचा प्रसार व सर्वांना रोजगार (अनुच्छेद ३९, ४१ व ४३) ग्रामपंचायतींना स्वशासनाचे अधिकार (अनु ४०) १९६० पर्यंत सर्व मुलामुलींना प्राथमिक शिक्षण (अनु.४५) दारुबंदी (अनु.४७) गोवंश हत्याबंदी व पर्यावरणाची सुरक्षा (अनु. ४८) बेकारी वाढली. ४० टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली. भ्रष्टाचार वाढला, आर्थिक विषमता सांप्रदायिक अशांतता ६ लाख खेड्यात आर्थिक, सामाजिक व नैतिक स्वातंत्र्य मिळवावयाचे आहे.

हे सर्वचित्र असे आहे हे बदलावयाचे असेल तर शालेय जीवनातील प्रतिज्ञेशी प्रामाणिक राहणे आवश्यक आहे.

अचलकुमार टिल्लू
संपादक

• • •




वर्ष चौथे / अंक ८ / फेब्रुवारी २०००

**संपादक**
श्री. अचलकुमार टिह्लू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
प्रा. संतोष राणे
सौ. भारती जोशी
सौ. मंगला पाटणेकर
सौ. मनाली देवप
सौ. विशाखा देशपांडे
श्री. संजय बोरकर
सौ. विनोदिनी राणे
सौ. सुलक्षणा पाध्ये
कु. दीपाली भाटकर
कु. सुगंधा चव्हाण

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२७
**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ११

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिह्लू | |
| २) | मुंबई ते इटाली - एक विज्ञान प्रवास | सौ. विशाखा देशपांडे | ३ |
| ३) | मंत्रमुग्ध करणारी कसरत-जिम्नॅस्टिक्स | सौ. मंजिरी दांडेकर | ८ |
| ४) | शासकीय अनुदाने आणि पुरस्कार | श्री. रविंद्र मांजरेकर | १४ |
| ५) | मी पाहिलेली इटाली (पूर्वार्ध२) | डॉ. ग.त्रिं. दाभाडे | १८ |
| ६) | ग्राहक चळवळ व ग्राहक कायदा | प्रा.(सौ.)आशा अ. दातार | २२ |
| ७) | व्यक्तिमत्व विकसाची प्रक्रिया | डॉ. अशोक जी. जोशी | २४ |
| ८) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | २६ |

सुविचार संकलन :
प्रा. मोहन पाठक यांनी केले आहे.

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

# मुंबई ते इटली – एक विज्ञान प्रवास

**सौ. विशाखा देशपांडे**

*(संदीप बालाने आंतरराष्ट्रीय विज्ञान ऑलिंपियाडमध्ये रौप्य पदक मिळवलेल्या यशाबद्दल त्याची ही विशेष मुलाखत.- संपादक)*

१८ जुलै ते २७ जुलै'९९ दरम्यान इटली (पडोवा) मधे झालेल्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिंपियाड मधे यशस्वी होऊन परतलेल्या भारतीय चमूचे नेतृत्व व मार्गदर्शन करणारे प्रा. रत्नाकर धारकर यांची मुलाखत दिशात देण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय विज्ञान ऑलिंपियाड परीक्षेचा इतिहास आणि त्याचे आयोजन कसे केले जाते त्याची तपशीलवार माहिती प्रा. धारकर यांनी आपल्या मुलाखतीत दिली होती. त्यांच्या या पाच जणांच्या चमूत मुंबईच्या संदीप बाला यानेही रौप्य पदक पटकावले होते. या परीक्षेची भारतामधे राष्ट्रीय स्तरावर निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर ते थेट आंतरराष्ट्रीय स्पर्धा परीक्षेमधे रौप्यपदक पटकावून, यशस्वी होऊन मायदेशी परते पर्यंतचा प्रवास संदीपने अनुभवला. याच दरम्यान त्याच्या अत्यंत महत्त्वाच्या म्हणजे भावी आयुष्याला दिशा देणाऱ्या अशा दोन परीक्षाही त्याला पार पाडाव्या लागल्या. त्या म्हणजे बारावी आणि आय.आय.टी. चा जॉईंट प्रवेश परीक्षा. या सगळ्याच महत्वाच्या परीक्षांचा ताळमेळ त्याने कसा साधला आणि त्यांची तयारी कशी केली या सगळ्याची उत्सुकता मनामधे भरून होती. हो ! कारण हल्ली कोणतीही स्पर्धा परीक्षा, म्हणजे अगदी मिडल स्कूल स्कॉलरशिप परीक्षा म्हणजे सुद्धा एक अवडंबरच असतं. तेव्हा काहीतरी नवीन शिकावं, अनुभवत रहावं या भावनेने, संदीपला भेटण्याची फार इच्छा होती. आय.आय.टी. मधे इलेक्ट्रिकल इंजिनियरींगला नुकताच प्रवेश घेतलेला संदीप मोकळा मिळणं फारच कठीण जात होतं. संदीपने पूर्ण पणे सहकार्य दिले आणि शेवटी त्याच्या घरी, कुलाब्याला त्याची मुलाखत घेण्याचा योग आला. संदीपचे वडील 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' मधे शास्त्रज्ञ आहेत. त्या मुळे बुद्धिमत्तेचा वारसा तर संदीपला मिळाला होताच. पण बरोबरीने साधेपणा आणि विनयशील पणा सुद्धा होता, त्यामुळे त्या ठिकाणी नकळत सरस्वतीचं वास्तव्य जाणवतं होतं. टी.आय.एफ. आर. ची कॉलनी असल्यामुळे गप्पांच्या ओघात संदीपच्या आईने त्यांच संपूर्ण घर दाखवलं. कुठेही भपकेबाजपणा नसलेल्या, अत्यंत साध्या मांडणीच्या घरामधे खोल्या भरपूर होत्या. पण त्यामधे खास संदीपच्या अभ्यासाची खोली वगैरे आढळली नाही.



संदीप बाला

अगदी हसत खेळत गप्पा मारत संदीपने अनौपचारिक मुलाखत दिली. कॉलेजच्या मुलांकरता विशेष महत्वाची आहे असं वाटतं.

☆ संदीप, मला तुझ्या शालेय जीवनाबद्दल काही सांग !

❐ माझं शालेय शिक्षण कुलाब्याच्या सेंट जोसेफ स्कूल मधे झालयं. शालेय जीवनात मी सर्व गोष्टींचा आनंद लुटला. अभ्यासाबरोबर मला संगीताची आणि खेळांची पण आवड आहे. मला दोन्ही, भारतीय आणि जास्त करून पाश्चात्य संगीत आवडतं. सर्व प्रकारचे खेळ आवडतात. विशेष करून क्रिकेट. मी स्वत: टेनिस खेळतो आणि सध्या गिटार शिकत आहे. प्रांजळपणे सांगतो, शाळेचे दिवस कधीच सरू नयेत.

☆ शाळेमध्ये असताना तू कोणत्या बाह्य स्पर्धा परीक्षांना बसला होतास ?

❐ मी हायस्कूल स्कॉलरशिपला बसलो होतो. पण मला स्कॉलरशिप काही मिळाली नाही. चित्रकलेच्या दोन्ही परीक्षा दिल्या. शिवाय राष्ट्र भाषा हिंदीच्या पण परीक्षा दिल्यात.

☆ तू होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेला बसला होतास का ?

❐ नाही. कारण आमची शाळा विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसवत नाही.

☆ तुझ्या आवडीचे विषय कोणते ?

❐ तसे सर्व विषय आवडतात, पण जीवशास्त्र अजिबात आवडत नाही.

☆ संदीप तू या ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेला बसायचं कसं आणि केव्हा ठरवलसं ?

❐ मला माझ्या वडीलांनी या परीक्षेबद्दल माहिती दिली आणि, '' तुला बसावसं वाटत असेल तर तू जरूर बस'' असं सांगितलं शिवाय आमच्या के.सी. कॉलेजच्या भौतिक शास्त्राच्या प्राध्यापिका दीना वीरा यांनी मला खूपच प्रोत्साहन दिलं. आमच्या कॉलेजमधून पण बरीच मुलं बसली होती.

☆ तू बाकी कुठल्या विषयाकडे न वळता भौतिकशास्त्रच का निवडलसं ?

❐ मला अकरावी नंतर या विषयात आणि इलेक्ट्रॉनिक्स् मधे फार गोडी निर्माण झाली. मॉडर्न फिजिक्स् मधे मला खूप रस आहे.

☆ या परीक्षेची निवड प्रक्रिया सुरू झाली तेव्हा तू बारावीला होतास. शिवाय आय.आय.टी. प्रवेश परीक्षेला पण बसणार होतास मग या महत्त्वाच्या परीक्षेच्या तयारीमधून तू ऑलिंपियाडची तयारी कशी केलीस ?

❐ राष्ट्रीय ऑलिंपियाड प्रवेश परीक्षेसाठी मी वेगळी अशी तयारी केलीच नव्हती. कारण मी आय.आय.टी. प्रवेश परीक्षेचा अभ्यास करत होतो. त्याच्याच आधारावर मी त्या परीक्षेत पास झालो आणि अंतिम निवड झाल्या नंतर आम्ही होमी भाभा सेंटर, मानखुर्द येथे जे प्रशिक्षण घेतलं तेवढंच या परीक्षेसाठी एकमात्र प्रशिक्षण होतं. या परीक्षेसाठी तयारी करण्याकरिता कोणतेही प्रशिक्षण वर्ग नाहीत. तुम्हाला ९वी ते १२वीच्या अभ्यासाची जय्यत तयारी करावी लागते. आय.आय.टी. परीक्षेचा अभ्यास मात्र खूप उपयोगी पडला.

संदीप १२वीच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत दहावा आला होता आणि आय.आय.टी. परीक्षेमधे संपूर्ण भारतातून निवडलेल्या पाच हजार विद्यार्थ्यांत चाळीसावा आला होता.

☆ या तुझ्या उपक्रमामधे तुझ्या आई-वडीलांचा आणि शिक्षकांचा कोणत्या प्रकारे सहभाग होता ? त्यांनी तुला कसे सहकार्य केले ? वडील विज्ञान क्षेत्रात असल्याचा अधिक फायदा कसा झाला ?

---

आई हा पहिला गुरु होय.

❐ आईकडून तर सतत प्रेरणा मिळतच होती. वडीलांशी मी बऱ्याच गोष्टींची चर्चा करत असतो. त्यांचे मार्गदर्शन घेत असतो आणि परीक्षे संबंधित जे काही असतं त्याचं मार्गदर्शन मी माझ्या शिक्षकांकडून घेतो.

☆ संदीप, तुला जेव्हा कळलं आपली आंतरराष्ट्रीय परीक्षेसाठी निवड झाली आहे, तेव्हा तुला काय वाटलं ? तुझ्या भावना काय होत्या ?

❐ मला आनंद जरूर झाला. पण मी उत्तेजित वगैरे झालो नाही. पण मला माझ्या प्रयोगामुळे निवडण्यात आले या गोष्टीचं खूप बरं वाटलं.

☆ तू केलेला प्रयोग काय होता ?

❐ हं ! त्या प्रयोगाचं नाव आहे 'ब्लॅक बॉक्स् एक्सपेरिमेंट'.

या प्रयोगामधे चार टोकं (Terminal ) असलेली एक बंद पेटी सादर केली जाते. या पेटी मधे काही diodes आणि काही अवरोधक (Resistance) यांची एका विशिष्ट मालिकेमधे जोडणी केलेले असतात. जोडणी केलेल्या diodes व resistance ची संख्या गुप्त ठेवलेली असते. प्रयोग करणाऱ्याने चार टोकां पैकी योग्य त्या दोन टोकांतर्फे विद्युत प्रवाह, विद्युत दाब, आणि विद्युत विरोध या सर्वांची सांगड घालून प्रत्येक दोन टोकांच्या जोडीमधे असलेल्या diodes व resistance यांची मांडणी सांगावयाची असते. यातील विज्ञान प्रेमींसाठी अत्यंत कठीण परंतु तेवढाच उत्कंठता वाढवणारा व जिज्ञासा पूर्ण करणारा भाग म्हणजे प्रत्येक प्रयोगार्थीने नेमून दिलेल्या प्रयोगाच्या हेतूकडे, कोणत्याही विचाराचा पूर्वग्रह न ठेवता, अत्यंत तटस्थपणे सामोरे जावे लागते.

बहुधा जगातील सर्वच विज्ञान शास्त्रज्ञांनी त्यांच्या आयुष्याची सुरूवात काहीशी अशा प्रकारेच केलेली असावी लागते.

☆ तुझ्या या उपक्रमामधे भारत सरकार कडून तुला काय सोयी उपलब्ध झाल्या ?

❐ परदेशी प्रस्थानाबाबतच्या माझ्या वैयक्तिक कागद पत्रां व्यतिरिक्त भारतात आयोजकांकडून सर्वच सुविधा उपलब्ध झाल्या.



**पदार्थ विज्ञान ऑलिंपियाडमधे रौप्य पदक पटकावलेल उभे (डावीकडून उजवीकडे) : हर्ष मध्यस्थ, सुव्रत राजू, मयांक रावत, संदीप बाला, प्रा. विजय सिंग, अमित अगरवाल, प्रा. रत्नाकर धारकर मध्यभागी बसलेला गाईड : डीगो फ्लोगोरिआना**

☆ तुमच्या चमूला, मिळून, सांघिक तयारी करण्या करता काय काय करावं लागलं ?

❐ ही परीक्षा वैयक्तिक तत्वावर असते. तिथे प्रत्येक विद्यार्थ्याला स्वत:च असं काहीतरी वेगळं करून दाखवावं लागतं. पण तरीही सांघिक तयारी करण्याकरता म्हणून आम्हाला काही पुस्तकं देण्यात आली. शिवाय आधीच्या वर्षाचे पेपर्स पण दिले होते. पण त्याचा फारसा उपयोग होत नाही कारण दरवर्षी सर्व प्रश्न व प्रयोग हे पूर्णपणे नवीन असतात.

☆ तुम्ही इटलीला पोचल्यावर तुमचं स्वागत कसं झालं?

❐ खरं म्हणजे तिथे आपल्या सारखं जल्लोषात स्वागत वगैरे करण्याची पद्धत नसावी. कारण आम्ही तिथे पोचल्या नंतर पाहिलं की आमचं स्वागत करण्यास कोणीच आलं नव्हतं. तिथे भाषेची खूप अडचण यायची. आमचं ठिकाण आम्हीच शोधून काढलं. आम्ही शनिवारी पोहचलो, आणि रवीवारी तिथली दुकानं वगैरे बंद असतात. मग फोन करून संबंधितांना कळवलं. तेव्हा कुठे संध्याकाळी आमचा गाईड आम्हाला भेटायला आला. त्या रात्री आमच्या गाईडनी आम्हाला त्याच्या घरीच भोजनाला नेलं. आणि आम्ही मुळात एक दिवस आधी पोहचलो होतो.

☆ तिथे तुमचा दिनक्रम काय असायचा ?

❐ आम्ही तिथे १७ जुलैला पोहोलचो. १९ जुलैला उद्घाटन सोहळा झाला. २० तारखेला प्रात्यक्षिक परीक्षा होती. आणि २२ तारखेला लेखी पेपर होता. २१ ला आणि २३ला आम्हाला प्रेक्षणीय स्थळं बघायला नेलं.

☆ तू तिथे कोणता प्रयोग सादर केलास, ज्या साठी तुला रौप्य पदक प्रदान करण्यात आले ?

❐ मी 'टॉर्शन पेन्ड्यूलम' हा प्रयोग केला होता.

पदुवा विश्वविद्यालय येथे झालेल्या पदार्थ विज्ञान ऑलिंपियाड मधील अंतिम फेरीत लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांसाठी संदीप यांस 'टॉर्शन पेन्ड्यूलम च्या बांधणीतून निर्माण होणाऱ्या हिंदोळ्यांचा अभ्यास' करण्यास सांगण्यात आला.

प्रयोगामधे पीळ दिलला दोरा अथवा धातूची तार (Torsion wire) कोठल्याही लंब गोलाकृती (cylindrical)आकाराच्या वस्तूच्या मध्यात असलेल्या अतिसूक्ष्म छिद्रांतून (through microporous [hole] ) नेलेली असते. त्या तारेचे एक टोक न विचलित होऊ देता दुसऱ्या टोकाकडून त्यास आवश्यकते प्रमाणे पीळ वाढवून त्या ठिकाणी लंबकाचे प्रमाणे वावरणाऱ्या लंबगोलाकृती वस्तूच्या लयबद्ध हिंदोळ्यांचा अभ्यास केला जातो.

वास्तविक बघता हा प्रयोग अत्यंत साध्या प्रकारात मोडला जाईल. कारण आपण सर्वांनीच बालपणात सुताच्या दोऱ्यामधे एखादी काडी टोचून अथवा रबरबँड मधे काडी किंवा पिन अडकवून हा प्रयोग उनाडक्या करीत असताना गंमत किंवा चाळा म्हणून केलेला असतोच. परंतु पदार्थ विज्ञान ऑलिंपियाडची विशेषता म्हणजे या प्रयोगातील अनुमानाला मार्क नसून, त्यातील रचना, सिद्धता, निरीक्षणांचे कोष्टकीकरण सिद्धतेच्या दरम्यान प्रकट होणाऱ्या प्रायोगिक त्रुटी व त्यांचे ससंदर्भ स्पष्टीकरण ह्या सगळ्यातून साकारणारे प्रयोगाचे नेमके सादरीकरण ह्या वरच संपूर्ण गुण अवलंबून होते.

☆ 'संदीप, इतर देशातल्या विद्यार्थ्यांनी कितपत तयारी केली होती ?

❐ तेथे इतर अनेक देश आले होते. रशियन विद्यार्थ्यांनी चांगली तयारी केली होती. पण इराणी विद्यार्थी अत्यंत हुशार, आणि सिरियसली तयारी करून आले होतो. त्यांना पाच सुवर्ण पदके मिळाली. इस्रायली विद्यार्थी सुद्धा या परीक्षेबाबत खूपच विचारी आणि तयारीचे वाटले. पोर्तुगिजांना येवढा सिरियसनेस नव्हता. चिनी विद्यार्थी अत्यंत बुद्धीमान होते, आणि त्यांना प्रशिक्षण सुद्धा उत्तम प्रकारे मिळाल्याचे दिसत होते. एकंदरीतच सर्वच देश उत्तम तयारी करून आले होते.

☆ पदुवा शहराबद्दल आम्हाला काही सांग.

❐ पदुवा शहर म्हणजे विश्वविद्यालाच्याच इमारती. वेगवेगळे विभाग निरनिराळ्या ठिकाणी असलेले. तिथे व्हेनिस शहर बघितलं आणि त्याच्याबद्दल जे ऐकलं होतं

तेवढं ते छान वाटलं नाही. रस्ते अरुंद व गजबजलेले. एकंदरीत जुनाटच. बाकी मी शाकाहारी असल्यामुळे माझे जेवणाचे फार हाल झाले. तिथे पास्त नावाचा प्रकार फार असतो. पिझ्झा व ब्रेड यावर मला दिवस काढावे लागले. मांसाहारी लोकांसाठी विविध प्रकार उपलब्ध होते.

☆ इटलीमधे फिरताना कुठे भारतीय भेटले होते का?

❐ नाही. फिरत असताना भेटले नाही. पण आमच्या बक्षिस समारंभाला पदुवाच्या महापौरांच्या वतीने एक भारतीय गृहस्थ आले होते. ते तिथे पंचवीस वर्षा पासून स्थायिक आहेत आणि तिथे त्यांचा स्वत:चा व्यवसाय आहे.

☆ संदीप, या परीक्षेसाठी आपल्या देशातून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी यशस्वी होऊन येण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळावी म्हणून, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी तू काय सुचवशील ?

❐ या परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या नेहमीच्या शैक्षणिक अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रित करावं आणि आय.आय.टी. जॉईंट प्रवेश परीक्षेचा अभ्यास करावा. पुढील विद्यार्थ्यांसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा !

इतक्या लहान वयामधे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल करणाऱ्या या तरूण पिढी कडून देशाच्या अनेक अपेक्षा आहेत. भारतामधेच उच्च शिक्षण घेऊन या सर्वांनी भारताच्या विकासासाठी झटणे आणि एकविसाव्या शतकाच्या आरंभी सर्वात प्रगत देश म्हणून सर्व देशांच्या यादीत भारताचे नाव अग्रस्थानी ठेवावे. अशी प्रामाणिक इच्छा आहे. कदाचित या मधीलच कोणी अमर्त्य सेन यांच्या नंतरचे नोबेल पारितोषिक विजेते असतील, परंतु उच्च शिक्षित होऊन, अमेरिकास्थित अनिवासी भारतीय न होता, देशाला अभिमान वाटेल असे 'भारत रत्न' व्हावें !

या सर्वांचा 'दिशा' तर्फे उज्ज्वल भवितव्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

**मुलाखत आणि लेखन : विशाखा देशपांडे**

दूरध्वनी : ५४० २३०६

श्री. संदीप बाला
१०८, 'भास्कर' टी.आय.एफ.आर. कॉलनी,
कुलाबा, मुंबई ४०० ००५.
दूरध्वनी : २१६१११७

• • •

विद्या प्रसारक मंडळास

हार्दिक शुभेच्छा !

## त्रिमूर्ति गृह उद्योग

लक्ष्मी निवास, विष्णू नगर,
बेडेकर मराठी मीडीयम शाळे समोर,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

आम्ही पुरणपोळी, गुळपोळी, मोदक, गुलाबजाम, बटाटेवडे, समोसे, पॅटीस, पोळी-भाजी, झुणका-भाकर, आगाऊ सुचनेनुसार पूरवितो.
तसचे आम्ही मंगल कार्याच्या ऑर्डर्स स्विकारतो.

श्री. शरद र. मुळे / श्री. दिलीप हरी ठोसर

---

मुलाला जन्म दिला की आई होता येतं, आईपण मात्र याहून कठीण असतं.

# मंत्रमुग्ध करणारी कसरत - जिम्नॅस्टिक्स

**सौ. मंजिरी दांडेकर**

*(जिम्नॅस्टिक्स ही कठीण व कष्ट साध्य कला आहे. आपल्याकडे या क्रीडाप्रकारावर म्हणावे तसे ध्यान दिले जात नाही. म्हणूनच त्याविषयी ही माहिती.- संपादक)*

दूरदर्शन या क्रीडा वाहिनीवर एक दिवस ऑलिपिक्स मधील खेळांचे प्रक्षेपण सुरु होते. त्यात एक युवती एका अरुंद फळीवर डौलदारपणे वागडत होती, मधेच गिरकी घेत होती तर मधेच कोलांटी उडी मारुन त्या अरुंद फळीवर स्थिरावत होते.. कधी हृदयाचा ठोका चुकवणारी पण तितकीच हृदयंगम मनोहर कसरत. आम्ही मंत्रगुग्ध होऊन पहातच राहिलो. तो होता 'जिम्नॅस्टिक्स' हा क्रीडा प्रकार.

या खेळाविषयी कुतुहल जागृत झाले आणि कोणाला विचारावे या विचारात असतानाच आठवण झाली ती छत्रपती पुरस्कार विजेत्या श्री. मंगेश इंगळे सरांची. आपण आधी सरांची ओळख करून घेऊ.

राज्यपातळीवरील स्पर्धेत १९८१ ते ८७ या काळात मुंबईचे प्रतिनिधीत्व करून चँपियनशिप प्राप्त केली. तसेच १९८२ ते ८६ या सलग पाच वर्षात आंतर राज्य स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करून चँपियनशिप मिळविली व त्यांची १९८७ च्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून निवड झाली. तसेच १९८५ मधे ऑलिपिंक पूर्व स्पर्धांसाठी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले. आतापर्यंतची कारकीर्द एक खेळाडू म्हणून गाजवली. पण पुढे या खेळाचा -क्रीडा प्रकाराचा-प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी प्रशिक्षक पदासाठी ज्या परीक्षा आवश्यक असतात त्यात ६२% गुण मिळवून द्वितीय श्रेणी प्राप्त केली. या सर्वाचे फलित म्हणजे १९८५-८६ या वर्षात त्यांना शिवछत्रपती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

अशा या हरहुन्नरी, सदा हसतमुख, कार्यतत्पर, खेळाविषयी आच, जाण असणाऱ्या सरांना जिम्नॅस्टिक्स या क्रीडाप्रकाराचा उगम, सुरुवात त्यातील टप्पे, नियम याविषयी विचारले असता ते म्हणाले,

या खेळाचा जन्म प्राचीन ग्रीसमधे झाला असे मानतात. ग्रीक सुवर्णकाळात अथेन्समधील लीसियम, अँकेडेमिया व सायनोसारजेस या तीन क्रीडागृहांमधून हा खेळ खेळला जात असे. पण त्यावेळी त्याचे रूप भिन्न होते. ग्रीक अर्थाप्रमाणे 'जिम्नॅस्टिक' म्हणजे उघड्या अंगाने करावयाची कसरत. शारीरिक लवचिकतेचा एक प्रकार. चापल्य हाच कणा. शारीरिक हालचालींची गतिमानता अगदी स्वाभाविक तऱ्हेने व्यक्त करणे, जणू काही सहज ताणले जाणारे रबर.

दोरावर चढणे, झुलत्या कड्या, इंडियन क्लब्ज म्हणजे मुदगल किंवा जोड्या असलेही प्रकार त्यावेळी जिम्नॅस्टिक्समधे केले जात. शारीरिक आरोग्य उत्तम राखणे हाच एकमेव उद्देश त्यात होता. नंतर रोमन सम्राटांनी या खेळातून मिळणारी ताकद, वाढणारे धाडस, लाभणारी लवचिकता व वाढणारा कस याचे मूल्य ओळखून सैन्याकरिता हा खेळ अनिवार्य केला. चीनमध्ये सुद्धा हा खेळ फार पूर्वीपासून आढळतो. भारतात डोंबारी नाही का कसरतीचे एकाहून एक अवघड खेळ करून दाखवत ?

आंतरराष्ट्रीय स्तरावर या खेळाला सूत्रबद्ध, संघटित स्वरूप आले ते दुसऱ्या महायुद्धानंतर, आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स संघटना स्थापन झाल्यावर. आता राष्ट्रीय, जागतिक, ऑलिपिक्स, एशियाड सर्वच स्तरांवर ही

संघटना जिम्नॅस्टिक्सचे नियंत्रण करते. म्हणजे नियम बनवणे, पंचपरीक्षा घेणे, साहित्यांची मोजमापे ठरवणे वगैरे सर्व या संघटनेचे काम. या संघटनेने केलेले नियम जगभर पाळले जातात. सध्या नियमाप्रमाणे पुरुषांना सहा तर महिलांना चार क्रीडाप्रकार करावे लागतात. यातही जिम्नॅस्टिक्सचे वैशिष्ट्य आहे.


हा क्रीडाप्रकार लोकप्रिय कधी झाला ? व त्याच्या वैशिष्ट्यांबाबत सांगा असे म्हटल्यावर ते पुढे म्हणाले की खरं तर ऑलिंपिक्स सुरु झाल्यापासून हा क्रीडाप्रकार आकर्षक व लोकप्रिय झाला आहे. १९६० च्या ऑलिंपिक्सचे दूरदर्शनवर प्रक्षेपण झाले. तिथून त्याचा प्रचार झाला. पुढे १९७२ च्या ऑलिंपिक्सचे प्रक्षेपण झाले तेव्हा भारतात तो माहीत झाला. १९७६ च्या ऑलिंपिक्समधे रुमानियाच्या १४ वर्षीय नादिया कोमेन्सी ने या क्रीडाप्रकारात चमत्कार घडवला. तिने ७ वेळा १० पैकी १० गुण मिळवले.


या प्रकाराच्या वैशिष्ट्याबद्दल सांगायचे म्हणजे इतर क्रीडा प्रकारांपेक्षा हा वेगळा आहे. अॅथलेटिक्स किंवा जलतरण यातील वेगवेगळा क्रीडाप्रकार निवडून त्यावर प्रभुत्व मिळवून तेवढाच प्रकार खेळला तरी चालतो. उदा. एखादा म्हणेल की मी फक्त ४०० मीटर्स धावण्यातच भाग घेईन किंवा जलतरणपटू म्हणेल की मी फक्त बटरफ्लाय पोहण्याच्या प्रकारातच भाग घेईन. हे चालेल. पण जिम्नॅस्टिक्स मधे असे नाही. यातील प्रत्येक साधनावर खेळाडूला कसरत करावीच लागते. पुरुष स्पर्धकाला स्पर्धेतील सहा साधनांवर तर महिला स्पर्धकांना स्पर्धेतील चार साधनांवर कसरत करणे अनिवार्य असते. त्यामुळे या खेळाडूंचे शरीर अतिशय प्रमाणबद्ध, बांधेसूद, पिळदार व कणखर बनलेले असते. लवचिकता वाढते तशी ताकदही वाढते. शिवाय या खेळात हाताच्या बोटांपासून ते पायाच्या बोटांपर्यंत प्रत्येक अवयवाला व्यायाम मिळतो.

यासाठी करावी लागणारी मेहनत व पूर्वतयारी विषयी सांगताना ते म्हणाले की , पूर्वतयारी म्हणजे तुम्हाला जो प्रशिक्षक मिळेल तो चांगला असावा. त्याच्या देखरेखीखाली सराव करताना व्यवस्थित करावा. साधनांवर सराव करताना योग्य ती काळजी घ्यावी. प्रशिक्षकाच्या सूचनांकडे लक्ष देणे आवश्यक. क्रीडाप्रकार करताना अंगाखांद्यावर चेनसारखे दागिने असू नयेत. महिला स्पर्धकांनी केस व्यवस्थित बांधावेत. पुरुष स्पर्धकांसाठी पांढरा बनियन व पांढरी ट्राऊझर-स्लॅक्स सारखी असा गणवेश तर महिला स्पर्धकांनी स्विमसूट घालावा असा संकेत आहे. पुरुष स्पर्धकांनी फक्त मैदानी कसरत (फ्लोअर एक्झरसाइज व व्हॉल्टसाठी शॉर्टस् (छोट्या पँटस्) घालाव्या लागतात.

एवढी प्रास्ताविक झाल्यावर मग ते क्रीडासाधने व नियम याकडे वळले.

पुरुषांसाठी असलेल्या प्रकारात बारचे दोन प्रकार आहेत. 'हॉरिझाँटल' (Horizontal) म्हणजे एकेरी बार. जमिनीपासून ८ फूट अंतरावर तितक्याच मापाचा आडवा दंड आपण सिंगल बार म्हणून ओळखतो. पूर्वी हा लाकडी






असे. तर आता तो स्टील स्प्रिंगचा बनलेला असतो.

त्यामुळे त्याला एक ठराविक लवचिकता असते. त्यावर हात पकडून शरीराच्या वर्तुळाकार गिरक्या, फिरक्या व मनोहर कसरती केल्या जातात.


कधी कधी तर एका हाताच्या आधारावर त्या बार भोवती गिरक्या घेणारे खेळाडू आपण पाहतो.

दुसरे साधन म्हणजे दुहेरी दंड-पॅरालल बार. आपल्याकडे बऱ्याचशा व्यायामशाळांमधे लोखंडी डबलबार लावलेले दिसतात. तेच याचे प्राथमिक स्वरुप.




पण स्पर्धेसाठी मात्र लाकडी दंड वापरले जातात. जे पोखरून त्यातून एक लोखंडी सळी आरपार घातलेली असते. त्यामुळे त्यालाही थोडा लवचिकपणा आलेला असतो. या दोन बारना पकडून हाताखेरीज शरीराच्या कोणत्याही भागाचा स्पर्श होऊ न देता दंडांच्या पातळीत (बारच्या) त्याच्या वरच्या, खालच्या पातळीत, एक हात सोडून असे वेगवेगळे प्रकार केले जातात.

याखेरीज हॉर्स म्हणजे लाकडी घोडे असतात. चार पाय व घोड्याच्या आकाराचे शरीर असे याच रूप. त्यातला एक असतो 'व्हॉल्टिंग हॉर्स'. एका बाजूने धावत येऊन 'स्प्रिंग बोर्ड' वर उडी घेणे, हॉर्सवर हात टेकवून पलीकडे गाद्यांवर उतरणे.



पायातील ताकदीचा उपयोग करून प्रचंड वेगाने धावणे. हवेत शरीर झोकून देण्याचे धैर्य, हवेतच उलट सुलट गिरक्या, वळणे घेण्यातील कौशल्य आणि पुन्हा अलगद जमिनीवर उतरण्यातील तोलाचे अद्वितीय कसब हे या प्रकारचे वैशिष्ट्य. विभिन्न प्रकाराने या उड्या मारण्याच्या पद्धती आणि त्यानुसार त्याचे गुण ठरलेले असतात.

चौथा प्रकार म्हणजे पामेल हॉर्स. व्हॉल्टिंग हॉर्सला मधल्या बाजूस दोन कड्या लावल्या की झाला पामेल हॉर्स तयार. हा सर्वात कसाचा प्रकार.






केवळ दोन हात कड्यांना पकडून विविध दिशांनी शरीराच्या लयबद्ध हालचाली, पायांच्या एकेरी, दुहेरी, वर्तुळाकृती गिरक्या आणि हे करत असताना हातांखेरीज शरीराच्या दुसऱ्या कोणत्याही भागाचा 'हॉर्सला' स्पर्श होता


कामा नये. अतिशय सुंदर व तितकाच कठीण प्रकार. या प्रकारात हंगेरीच्या झोल्टन माग्यारने एवढे प्रभुत्व मिळवले की त्याने ओळीने तीन जागतिक स्पर्धांत या प्रकारचे सुवर्णपदक मिळवले.

असाच आणखी ताकदीचा एक प्रकार म्हणजे रोमन रिंग्ज.





यापूर्वी झुलत्या कड्यांवर कसरत करावी लागे. त्या कड्या हलू न देता त्यावर तोलाचे, झोक्याचे प्रकार करावयाचे असतात . त्यामुळे दंडातील स्नायूंबरोबरच पोटातील स्नायूही चांगले घडवले जातात.

पुरुषांसाठी सहावा व शेवटचा प्रकार म्हणजे 'फ्लोअर एक्झर साईज' किंवा मैदानी कसरत. १४मी. १४ मी. मापाच्या गादीवर १२ मी. १२ मी. मापाच्या चौरसात ही कसरत करायची असते.




ही कसरत करण्यासाठी कालावधी ५० ते ७० सेंकद






असतो. या कालावधीत विविध प्रकारे कोलांट्या, वेगवान कसरती, तोलाचे प्रकार यांच्यामुळे डोळ्यांचे पारणे फिटते. केवळ एकेरीच नव्हे तर दुहेरी व हवेतील कोलांट्याही हे खेळाडू सहजपणे मारतात. विशेषतः चिनी, जपानी तसेच रशियन खेळाडू या तंत्रात खूपच तरबेज आहेत.


महिलांच्या जिम्नॅस्टिकमध्ये जे चार प्रकार असतात त्यातही मैदानी कसरत हा प्रकार असतोच. पण त्याला साथ असते सुरम्य अशा पार्श्वसंगीताची. यासाठीचा कालावधी ६० ते ९० सेंकद एवढा असतो.




फुलाफुलांतून अखंड उमलत असते नवता




पार्श्वसंगीताच्या लयीत, ठेक्यात सुरेख नृत्यमय हालचाली, पदलालित्य आणि त्या बरोबरच चित्तथरारक कसरती हे महिलांच्या फ्लोअर एक्झरसाइजचे वैशिष्ट्य. नजाकत आणि ताकद या दोन्हींचीही तितकीच आवश्यकता.






व्हॉल्टिंग हॉर्स महिलांसाठीही असतो. पण पुरुष उभ्या दिशेने तर महिला आडव्या दिशेने उड्या मारतात.


महिलांसाठी डबलबार ऐवजी अनईव्हन पॅरालल बार असतो. म्हणजे जमिनीला व एकमेकांना समांतर दंडच. पण ते जमिनीपासून सारख्याच उंचीवर नसतात म्हणून त्याला अनईव्हन बार म्हणतात. एक जमिनीपासून १.५०मी. तर दुसरा कमीत कमी २.३० मी. वर किंवा जास्तीत जास्त २.८५ मी. वर.






यातही मुख्य हाताची पकड वापरून कसरती केल्या जातात. मुलांचे सिंगल बार वरील प्रकारही यात केले जातात हा यातला महत्त्वाचा बदल. या बारवर कसरती करणे कठीण असते. या प्रकारावर प्रभुत्व मिळविण्यासाठी हवे धैर्य, मजबूत खांदे आणि बाहू कारण एका बारवरून दुसऱ्या बारवर जाण्यासाठीच्या हालचाली या झटपट आणि कौशल्यपूर्ण असाव्या लागतात.

महिलांसाठीचा चौथा प्रकार म्हणजे बॅलन्सींग बीम. जमिनीपासून १.१० मी. वर असलेला हा बीम ५ मी. लांब व १० सें. मी. रुंद असतो.





यावरच्या कसरती ७५ ते ९५ सेकंदात करायच्या असतात. नृत्यमय हालचाली कोलांटी उडी, कार्टव्हील, वाय बॅलन्स इ. प्रकारातील नैपुण्य दाखवण्याची गरज असते. शिवाय बीमवरून खाली गादीवर उडी मारल्यानंतर तुमचा तोल जातो का तुम्ही तोल सांभाळता यालाही महत्व आहे.

या क्रीडाप्रकाराच्या गुणदान पद्धतीविषयी बोलताना ते म्हणाले, याची गुणदान पद्धत ही फेडरेशनने ठरविलेल्या कोड ऑफ पॉइंटस्‌वरून ठरवली जाते. दर ४ वर्षांनी याचे नूतनीकरण होते. या खेळासाठी ४ परीक्षक असतात. त्याशिवाय आणखी एक परीक्षक (सुपिरिअर जज्ज) असतो. हा खेळाडूला हिरवे निशाण अथवा हिरवे लाईट दाखवून इशारा करतो. मग ४ परीक्षक त्या खेळाडूच्या हालचालींचे अवलोकन करून गुणदान करतात. गुणदान करताना ४ परीक्षकांच्या मार्कांमधील फरकाला मर्यादा असतात. सुपिरिअर जज्ज गुणदान करताना या मर्यादा पाळल्या गेल्या की नाही हेही पाहतो. या सर्वांच्या बरोबर टाईमकीपरही असतो. प्रत्येक खेळाडूने तो तो क्रीडाप्रकार वेळेत सुरु करून संपवला की नाही हे तो पहातो.

स्पर्धेच्या संदर्भात त्यांनी सांगितले की, आपण जे एक्सरसाइज करणार ते नीट ठरवा. त्याचा नीट योग्य सराव करा. स्पर्धेची जागा, वेळ, व स्पर्धेच्या ठिकाणी किती वाजता हजर राहणे आवश्यक याची नीट माहिती करून घ्या. आपली प्रवेशपत्रिका वेळेवर जाईल ते पहा. खेळाला आवश्यक ते कपडे व इतर साधने बरोबर घ्या, ती स्वच्छ नीट नेटकी आहेत की नाहीत ते पहा. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे स्पर्धेच्या आदल्या रात्री तणावाखाली राहू नका, शांत स्वस्थ झोप घ्या.

स्पर्धेच्या ठिकाणी स्पर्धा सुरू होण्यापूर्वी, सुरु असताना व स्पर्धा झाल्यावर कोणती काळजी घ्यावी या संदर्भात ते म्हणाले स्पर्धा सुरु होण्यापूर्वी ३ तास काही खाऊ नका. कारण स्पर्धेच्या वेळी अन्न नीट पचवलेले असावे. स्पर्धेच्या ठिकाणी वेळेवर हजर रहा. ज्या साधनांवर तुम्ही क्रीडा प्रकार करणार ती साधने व त्या आजूबाजूची जागा पाहून घ्या म्हणजे रनअप् किती घ्यायचा, खेळ कसा करायचा हे ठरवता येईल. ट्रॅकसूट घालूनच वॉर्मअप (व्यायाम) करा, अर्थात हा व्यायाम सावकाश करावा.

स्पर्धा चालू असताना आत्मविश्वासपूर्वक आपले नैपुण्य दाखवा. परीक्षकांच्या सूचनांचे व्यवस्थित पालन करा. त्यांच्या परवानगीशिवाय खेळाला सुरुवात करु नका व स्पर्धा झाल्यावर जागाही सोडू नका. कारण त्यामुळे गुण कमी होण्याची शक्यता असते. स्पर्धेला सुरुवात करताना व संपल्यावर परीक्षकांना अभिवादन करण्यास विसरू नका. मैदानी कसरत करताना विशेषतः मुलींनी आपले संगीत बरोबर लागते की नाही याची काळजी घ्यायला हवी.

स्पर्धेत यशस्वी झालात तर उत्तेजित होऊ नका

(पान क्रमांक १७वर)

# शासकीय अनुदाने आणि पुरस्कार

**श्री. रवींद्र मांजरेकर**

*(शासनाने अनुदान व पुरस्कार द्यावेत का हा वादाचा मुद्दा आहे. या विषयाच्या बाबत दोन्ही दृष्टिकोण असू शकतात. या बाबतचा असाच एक दृष्टिकोण या लेखात समजावून घेता येईल. - संपादक)*

कोणताही समाज संक्रमणाच्या अवस्थेतून जात असला म्हणजे सर्व प्रस्थापित मूल्ये व्यवस्था यामध्ये आमूलाग्र बदल घडून येतात. त्या मूल्यांची, व्यवस्थेची योग्य-अयोग्यता, उपयुक्तता पुन्हा एकवार तपासून पाहिली जाते. त्यात योग्य ते फेरफार करून मगच ती मूल्ये पुढच्या पिढीकडे संक्रमीत होतात.

भारतीय समाज नेमक्या त्याच संक्रमणावस्थेतून जात आहे. या प्रक्रियेने वेग घेतला नसला तरी मूल्ये, व्यवस्था त्यांच्या योग्य-अयोग्यतेविषयी चर्चा, विचारमंथन 'मात्र निश्चित' सुरु झाले आहे.

आपल्या समाजव्यवस्थेने मान्य केलेल्या शासकीय अनुदाने आणि पुरस्कारपद्धतीविषयी आता समाजामध्येच मोठ्या प्रमाणावर विरोध होऊ लागला आहे. मराठी साहित्य संमेलनाला अनुदान देण्यावरुन निर्माण झालेला अशोभनीय वाद पु.लं.ना 'महाराष्ट्र भुषण' दिल्यावर पु.लं.नी केलेल्या आपल्या भाषणांवरील प्रतिक्रियांचा वाद आणि पं. रविशंकर यांना 'भारतरत्न' पुरस्कार जाहिर झाल्यावर करण्यात आलेली विधाने आजच्या या चर्चेचे निमित्त ठरले आहे. हे सारे प्रसंग आपण वृत्तपत्रांमधून सविस्तर वाचलेले आहेत. मी त्याच्या तपशिलात जात नाही.

वास्तविक, 'महाराष्ट्र भूषण' किंवा 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी बहुमानासंदर्भात वाद होणे चांगले नाही, तरी ते झाले शिवाय पदम किंवा इतर पुरस्कार देताना / देण्यावरुन होणारी मानपानाची नाटके हे सारे आपल्या सहिष्णु आणि पुरोगामी वृत्तीला 'क्षय' झाल्याचे लक्षण आहे. त्यावर उपाय योजण्याच्या दृष्टीने आज या विषयाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

शासनाचा लालफितशाही कारभार, भ्रष्टाचाराचे आगार असणारी शासकीय यंत्रणा यामुळे शासकीय प्रक्रियेविषयी समाजाच्या मनात विश्वासार्हता उरलेली नाही. त्यामुळे ज्या व्यवस्थेविषयी समाजात विश्वास नाही, त्या व्यवस्थेकडून होणाऱ्या प्रक्रियेवर तरी तो कसा असणार ?

सामाजिक, सांस्कृतिक उन्नती व्हावी, समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा या उदात्त हेतूने सुरू झालेली ही अनुदान आणि पुरस्काराची पद्धती आज ५० वर्षानंतर अविश्वासाच्या खोल गर्तेत सापडली आहे. गेल्या ५० वर्षात सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीची सामान्य लक्षणे तरी दिसायला हवी होती. परंतु अनुदान म्हणून दिले जाणारे पैसे ज्यांच्या करिता दिले गेले त्यांच्यापर्यंत ते पोहोचले का ? किंवा ज्यांना पुरस्कार दिले गेले ते सर्वच सर्वार्थाने योग्य होते का ? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच आहेत. त्यामुळेच समाजाच्या सर्वांगीण विकासाची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.

व्यवस्थेकडून नकारात्मक प्रतिसाद मिळतो आहे. याचा अर्थ व्यवस्थेच्या अंमलबजावणीमध्ये कोठेतरी दोष निर्माण झाला आहे तो दोष शोधून त्याचे निराकरण करणे

हे सद्यपरिस्थितीत शक्य आहे. कारण संक्रमणावस्थेमध्ये बदल करणे शक्य होते.

पुरस्कार आणि अनुदान देणे हे शासनाचे काम आहे का ? असा मुलभूत प्रश्न या ठिकाणी उपस्थित होणे साहजिकच आहे.

वास्तविक, हे शासनाचे कामच नाही. देशाच्या सीमांचे रक्षण करणे, देशांतर्गत कायदा आणि सुव्यवस्था कायम राखणे, राष्ट्रीय उत्पन्नाचे समसमान वाटप करणे आणि जनतेच्या सोयीकरता शिक्षण, उद्योग, आरोग्य, दळवळण या पायाभूत सुविधा पुरवणे एवढ्यावरच शासनाने आपले लक्ष केंद्रित करायला हवे. पण आपण स्वीकारलेल्या कल्याणकारी राज्यपद्धतीमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक उन्नती थोडक्यात समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे देखिल शासनाचे कर्तव्य मानले गेले आहे. सगळी मेख इथेच आहे.

राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक ही सर्व क्षेत्रे एकमेकांशी संबंधित झाल्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकेल आणि भारतासारख्या अत्यंत मागासलेल्या देशाला नव्या शतकांची आव्हाने पेलण्याच्या दृष्टीने ह्या क्षेत्रांचे केंद्रीकरणच गरजेचे आहे, असा विचार करून घटनाकर्त्यांनी कल्याणकारी राज्यपद्धतीचा स्वीकार केला.

परंतु कल्याणकारी राज्यपद्धतीच्या उद्दिष्टांचे नेमके उलट परिणाम आता जाणवू लागले आहेत, सर्वच क्षेत्रांचे राजकारण हे केंद्रस्थान झाले. सहाजिकच या सर्व क्षेत्रांच्या ज्या मूलभूत गोष्टी आहेत. त्यांना राजकारणाचा स्पर्श झाला. शासनाला समाजाचे कल्याण करण्याचे उद्दिष्ट साधण्याकरता ब्रेड, सुईपासून, उपग्रहनिर्मिती पर्यंत साऱ्याच गोष्टींकडे लक्ष पुरवावे लागले, त्यामुळे एक ना धड भाराभर चिंध्या अशी आपल्या शासनाची अवस्था झाली. सामान्य जनतेला सुखाचे दोन घासही नशिबी नाहीत, देशाच्या सीमाही सुरक्षित नाहीत आणि देशांतर्गत कायदा सुव्यवस्थेचेही तीन तेरा वाजले आहेत, अशी परिस्थिती आहे.

समाजातील काही घटकांच्या उन्नतीकरता आजही त्यांना अनुदाने मिळण्याची गरज आहे. त्यांचे प्रमाण लक्षात घेता ते खाजगीरित्या उभे करणे कठीण आहे. अशा ठिकाणी शासनाने संपूर्णपणे तटस्थ यंत्रणा उभी करून अनुदानासंदर्भात निर्णय घ्यायला हवेत. त्या करता त्या त्या क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थाचा सल्ला घ्यावा. अनुदानप्राप्त संस्थाच्या अनुदान वितरणाचा पाठपुरावा करण्याचे काम या अशासकीय संस्थाकडे द्यावे. भारतासारख्या महाकाय देशाचे , महाकाय प्रश्न सोडवणे कोणाही खाजगी संस्थेला किंवा व्यक्तीला शक्य नाही. ह्या प्रश्नांच्या सोडवणुकीकरता प्रचंड विस्तारित प्रशासन असणारी यंत्रणा म्हणून शासनाची आवश्यकता आहे. त्यामुळेच शिक्षण, आरोग्य इ. संदर्भात शासकीय अुनदाने आवश्यक ठरतात.

परंतु, 'पुरस्कार देणे' हे मात्र भारतासारख्या विकसनशील देशांच्या शासनाकरता चैन करण्यासारख्या आहे. कोणत्याही प्रकाराचे प्रत्यक्षपणे निर्मितीक्षम नसणाऱ्या गोष्टीवर अवाढव्य खर्च करणे ही चैनच आहे. त्यातही पूर्वीच्या काळी लोकमान्यतेकरता राजमान्यता आवश्यक होती. आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. लता मंगेशकर, पु.ल. देशपांडे, सुनिल गावस्कर यांना महाराष्ट्र भूषण म्हणा किंवा पं. रविशंकर, म.गांधी, पं. नेहरू यांना भारतरत्न म्हणा हे शासनाने सांगण्याची आवश्यकता नाही. किंबहुना राजमान्यता मिळाली तर लोकमान्यता मिळत नाही असा उलटा प्रवास सुरू झाला आहे. याचे उदाहरण द्यायचे झाले तर राज्य चित्रपट पुरस्काराचे देता येईल. एखाद्या चित्रपटाला ११,१२ पुरस्कार मिळतात, पण कोणत्याही चित्रपटगृहात तो चित्रपट एक आठवडाही तग धरू शकत नाही, हे उदाहरण पुरेसे बोलके आहे.

---

कृष्णघनांच्यां स्वर्गफुलांनी धरणीमाता खुदकन फुलली.

या पुरस्कारासंदर्भात सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा असा की, हे पुरस्कार तटस्थपणे दिले जात नाहीत. शिवाय संपूर्ण शासकीय यंत्रणा यासंदर्भात उदासीन असते. पुरस्कार वितरणाचे कार्यक्रम उरकायचे म्हणून 'चटावरचे श्राद्ध' उरकल्यासारखे उरकले जातात. कित्येकदा दोन/तीन वर्षांचे पुरस्कार प्राप्त स्वरूपात वितरित केले जातात. ह्या सर्व प्रकारामध्ये पुरस्कार प्राप्त व्यक्तीचा योग्य मान राखला जात नाहीच, पण त्यांना पुरस्काराची प्राप्त रक्कम मिळवण्याकरताही शासन दरबारी खेटे घालावे लागतात. असा सर्वसाधारण अनुभव आहे.

ही सारी प्रक्रियाच दांभिकपणाची वाटते. पुरस्कार मिळावा म्हणून प्रयत्न करण्यापासून या दांभिकपणाची सुरुवात होते. उदा. आदर्श शिक्षक पुरस्कार हवा असेल तर स्वतःची शिफारस स्वतःच करावी लागते. ह्या निंदनीय प्रकारामुळे खरे आदर्श शिक्षक या वाटेला जातच नाही. या पद्धतीमध्ये ज्याची योग्यता आहे तोच पुरस्काराचा मानकरी असेलच असे नाही. शिवाय खरा कलाकार, सच्चा विद्वान, साहित्यिक, शास्त्रज्ञ हा पुरस्काराच्या अपेक्षेने काम करीत नसतो. याचाही अनुभव समाजाने वारंवार घेतला आहे.

सारे काही शासनाने करावे, आम्ही फक्त टीका करणार या भारतीय समाजाच्या अट्टाहासी प्रवृत्तीमुळेच समाजातील सर्वच क्षेत्रे राजकारणाने व्यापली आहेत. त्यामुळे मूळ चांगल्या उद्देशाने सुरू झालेल्या अनुदान आणि पुरस्कार पद्धतीचे राजकीयीकरण झाले आहे. त्यातील तटस्थपणा लोप पावला, मग खुषामतखोरगिरी आली, सत्ताधाऱ्याच्या मर्जीतल्या लोकांना /संस्थाना अनुदाने आणि पुरस्कार यांची खिरापत वाटली जाऊ लागली. मग पुरस्कार 'मॅनेज' करणाऱ्या साहित्यिकांच्या, कलाकारांच्या टोळ्या अस्तित्वात आल्या. आज अशी अनेक उदाहरणे दाखवता येतील की ज्यांना अनुदाने देण्यात आली अशा संस्थाच अस्तित्वात नाहीत. त्यातच राजकारणाची खालावलेली पत पाहिली की आमच्या सामाजिक, सांस्कृतिक भवितव्याची काळजी वाटते. कारण दुर्दैवाने ते त्यांच्याच हातात केंद्रित झाले आहे.

वास्तविक स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण आपले राजकीय अधिकार लोकप्रतिनिधींना दिले. आपले सामाजिक, सांस्कृतिक अधिकार आपण त्यांना दिलेलेच नाहीत. त्यामुळे त्यांना या क्षेत्रात हस्तक्षेप करण्याचा अधिकारच नाही. परंतु ५० वर्षांपूर्वीच्या निरक्षरता आणि दारिद्र्य यांनी गांजलेल्या या देशात तेव्हा अशा प्रकारे विचार होणे शक्यच नव्हते. आज या घडीलाही राजकारण, समाजकारण, सांस्कृतिकरण हे वेगवेगळे करणे शक्य नाही, जादूची कांडी फिरवल्यासारखे ते एका क्षणात होईल असेही नाही. पण तसे करण्याची सुरूवात मात्र करायला हवी.

तेव्हा, या संदर्भात सर्व संबंधितांनी विचार करून आपपल्या क्षेत्रात तटस्थ संस्था निर्माण करव्यात, समाजात कोण चांगला साहित्यिक, कोण चांगला गायक, कोण देशभक्त हे ठरविण्याची मक्तेदारी शासनाकडे असता कामा नये. कारण ते सरकारचे कामच नाही. समाजातल्या गुणवंताचा गौरव समाजानेच करावा व तो ही प्रत्यक्ष - त्याकरता शासन हे माध्यम वापरण्याची काय गरज ? शासनाशिवाय भारतीय समाज संघटित होऊ शकत नाही का ?

शासनाने केवळ स्वतःच्या मूळ कर्तव्याशी प्रमाणिक राहावे, अशी अपेक्षा आपण बाळगणार असू तर शासनाच्या इतर वाढीव जबाबदाऱ्या कमी करायला हव्यात. त्याकरता स्वतंत्र पर्यायी यंत्रणा/व्यवस्था उभारली जाणे आवश्यक ठरणार आहे. शासनाने केवळ निरीक्षकांची व अत्यावश्यक ठिकाणी हस्तक्षेप करण्याची भूमिका बजावावी असं तेथे अपेक्षित असे. पुरस्कारासंदर्भातच नव्हे, तर अनुदानासंदर्भातही भविष्यात शासनाने आपला हस्तक्षेप थांबवणेच इष्ट ठरणार आहे.

---

साहित्यिक, समाजसेवक, शास्त्रज्ञ, शिक्षक, सैनिक यांचे समाजावर ऋण असते व ते समाजाने जरूर फेडायला हवे ! पण त्याची जबाबदारी शासनाने का घ्यावी ? त्यातही ज्या शासनकर्त्यांना केवळ 'घेणे' एवढेच ज्ञान आहे, त्यांना देतेवेळी त्रास होणारच आणि मग त्याच उद्वेगातून साहित्य संमेलन अनुदान वाद प्रकरणासारखी अनेक प्रकरणे यापुढेही होतील.

भविष्यामध्ये सत्ताधाऱ्यांची, शासनकर्त्यांची प्रत काय दर्जाची असेल, त्याची झलक आपण पहातोच आहोत. एखादी अप्रत्यक्ष सत्ताधारी व्यक्ती किती बेमुर्वतखोरपणे वागू शकते याचाही अनुभव आपण घेतला आहे. कल्पना करा, तीच व्यक्ति प्रत्यक्ष सत्ताधारी झाली तर, 'अशा वेळी शासनाशी संबंधित राहून त्यांचे मिंधेपण पदरात' पाडून घेण्यापेक्षा, संपूर्णपणे स्वायतत्ता असणारी तटस्थ यंत्रणा उभी करणे अधिक सयुक्तिक ठरणार आहे. सुदैवाने, महाराष्ट्रात तशी सुरुवातही झाली आहे.

या प्रक्रियेला वेग प्राप्त करून देण्याकरता भारतीय समाजाने आपली चलता है, होता है 'किंवा' 'मला काय त्याचे? ' ही मनोवृत्ती सोडणे ओघाने आलेच. तसे झाले तरच येणाऱ्या काळात समाजाला ललामभूत ठरणाऱ्या नामवंताचा अपमान होणे थांबू शकेल व 'लोकशाही' चे नवे पर्व सुरू होईल.

**श्री. रविंद्र मांजरेकर**
द्वारा: श्री. मकरंद नेवाळकर
२०१, स्मृती-बाजी प्रभू देशपांडे मार्ग,
विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२.

• • •

(पान क्रमांक १३वरून)

**मंत्रमुग्ध करणारी कसरत-जिम्नॅस्टिक्स**

अपयश आल्यास खचूनही जाऊ नका. आपल्या बरोबरच्या खेळाडूंचे अभिनंदन करण्यास विसरू नका. कारण यातूनच तुमची खेळाडू वृत्ती दिसते. जर तुम्ही अपयशी झालात तर आत्मपरीक्षण करा, काय चुका झाल्या त्या तपासा व त्या पुन्हा होणार नाहीत याची काळजी घ्या. इतर खेळांडूच्या खेळाचे निरीक्षण करून त्यातले चांगले तेवढेच घ्या.

शेवटी एवढेच सांगेन की जर अत्युच्च पदापर्यंत पोहोचायचे असेल तर कठोर परिश्रम हवेत, कठोर परिश्रमास पर्याय नाही.

**सौ. मंजिरी दांडेकर**
डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.), ठाणे.

• • •

A Well Wisher

# मी पाहिलेली इटाली (पूर्वार्ध २)

**डॉ. ग.त्रिं. दाभाडे**

*(मी पाहिलेली इटाली या लेखाचा दुसरा पूर्वार्ध येथे देत आहे. या प्रवास वर्णनाचा मागील अंकातील लेख आवडल्याचे अनेक वाचकांनी सांगितले होते.- संपादक)*

पृथ्वी स्थिर नसून सूर्याभोवती प्रदक्षिणा घालते तसे सूर्य केंद्रस्थानी असून त्याच्या भोवती इतर ग्रह फिरत असतात. चंद्र हा गोलाकार असून त्यावर दऱ्या, डोंगर आहेत. गुरुभोवती फिरणारे तीन चंद्र आहे. त्याचप्रमाणे पृथ्वी हा सूर्यमंडलाचा एक भाग आहे असे दुर्बिणीद्वारे सप्रयोग ज्याने सिद्ध करून युरोपच्या पोपच्या सत्तेचे सिंहासन ज्याने डळमळीत केले, तो महान शास्त्रज्ञ गॅलिलिओ गॅलीली (१५६४-१६४२) हा इटालीमधील पॅड्युआ (PADUA) येथील विद्यापीठात भौतिकी मिलीटरी इंजीनीअरींग शास्त्राचा प्राध्यापक होता. इ.स. १२२२ मध्ये स्थापिलेले पॅड्युआ विद्यापीठ हे बोलोन्या विद्यापीठानंतर इटालीतील सर्वात जुने विद्यापीठ आहे. अशा या विद्यापीठात गॅलिलीओने दीर्घकाळ दुर्बिणीद्वारे अभ्यास करून सुरुवातीस उल्लेखलेले महत्त्वाचे शोध त्याने त्याच्या 'सिडेरिअस ननीटस' या महान ग्रंथात नमूद करून ठेवलेले आहेत. पृथ्वी संबंधीची टॉलिमीची ब्रह्मांड कल्पना कशी चूक आहे हे सप्रयोग सिद्ध केल्याने २००० वर्षा पूर्वीच्या धार्मिक कल्पनेस प्रचंड धक्का बसला. त्यामुळे पोपच्या स्थानास धक्का बसण्याची दाट शक्यता असल्याच्या जाणीवेमुळे तत्कालीन कॅथॉलिक चर्चच्या धर्ममार्तंडांनी गॅलिलिओची न्यायालयीन चौकशी करून त्यास त्याचे शब्द मागे घ्यावयास लावले व त्यास कडक समज देऊन निषेध केला

ही घटना ज्या शहरात घडली व जेथे डांटेसारखा महाकवी व व्हिसेलियस सारखा शास्त्रज्ञ पॅड्युआ विद्यापीठाशी निगडित होते, त्या शहरास भेट देण्याचा योग फ्लोरेंसवरून ६ सप्टेंबर ९८ ला व्हेनिसला जाताना आला. व्हेनिसच्या पश्चिमेस ३५ किलोमीटर अंतरावर असलेले, इटालीच्या व्हेनेतो प्रांताची राजधानी म्हणून गाजलेले व बाकील्यॉन या नदीवर वसलेले टुमदार शहर म्हणजे महा ऐतिहासिक वारसा लाभलेले पॅड्युआ शहर होय. हे शहर दळवळणासाठी महामार्ग, लोहमार्ग तसेच पो, ब्रेटा इत्यादि नद्यांशी कालव्यांनी जोडलेले आहे. ह्या अतिप्राचीन शहराची स्थापना इ.स. पू. ३०२ मध्ये अँटिनोरने केली आहे असे सुप्रसिद्ध रोमन इतिहासकार लिव्ही यांचे मत आहे. हे शहर रोमन काळात रोम नंतर दुसऱ्या क्रमांकाचे सर्वच दृष्टीने संपन्न असे शहर होते. तर प्रबोधन काळात कलानिर्मितीचे महत्त्वाचे केंद्र होते. या शहराच्या विविध चर्चमध्ये आंद्रीआ मानतेन्या, जॉत्तो द बोंदाने, दोनातेलो, तिशन या महान कलाकारांनी काढलेली दुर्मिळ भित्तीलेप चित्रे, शिल्पकृती, वास्तुशिल्पे पाहून डोळ्याचे पारणे फिटत होते.

युरोपात सर्वात जुने समजणारे जगप्रसिद्ध वनस्पती उद्यान ( इ.स. १५०५) हे पॅड्युआ विद्यापीठाप्रमाणे एक महत्त्वाचे भूषण या शहराचे ठरले आहे. या उद्यानात गेल्या ५०० वर्षापासून अनेक दुर्मिळ वनस्पती जतन करून ठेवल्याने जगातील निरनिराळ्या भागातील वनस्पती शास्त्राच्या संशोधकांना ही एक महत्त्वाची पर्वणी वाटते. दिवसभर पॅड्युआ येथील विद्यापीठ, वनस्पती उद्यान, अप्रतिम भित्तिलेप चित्रे, वास्तुशिल्पे याना भेटी देऊन ६ सप्टें. ९८ च्या संध्याकाळी व्हेनिसच्या लिडो नावाच्या भागातील हॉटेल अँथनी (Anthony) या अलिशान हॉटेलात

राहण्याची सोय केली.

व्हेनिस या जल नगरीचा ''अॅड्रीअॅटीकची राणी'' या सार्थ नावाने उल्लेख का केला जातो हे त्या शहरात दोन दिवस राहून समजले. व्हेनिस या नगरीवर एखाद्या सौंदर्यवती प्रमाणे निसर्गाने अप्रतिम सौंदर्य बहाल केलेले आहे. एक विशेष म्हणजे येथील निळ्याशार रंगाचा अतिशय शांत असा अॅड्रीआटीकचा समुद्र ! हा व्हेनिसचा समुद्र इतका शांत की जसे कांही एखाद्या नीरव शांत वातावरणांत एखादा ऋषी तपश्चर्या करीत बसला आहे असे वाटते. एखादी वाऱ्याची शांत झुळुक आली की अतिशय संथपणे तयार होणारे तरंग या समुद्राच्या पाण्याच्या पृष्ठ भागावर पाहतांना वाटते की काय ही निसर्गाची किमया ! अत्यंत बारीक, मऊ वाळूचा प्रशस्त किनारा असलेल्या शांत समुद्रामुळे साऱ्या आकाशाची निळी पडछाया पाण्यावर पडल्यामुळे वाटते की समुद्र निळ्या पाण्याने तर नाही भरला ? इटालीच्या उत्तरेस असा सुंदर अशा अॅड्रीकआटीकच्या समुद्रधुनीच्या काठी असलेले व्हेनिस (Venice) ज्यास इटालीत व्हेनेझीया (Venezia) हे शहर १२० अश्या लहान मोठ्या जमिनीच्या भूभागाने ८ मैलाच्या परिसरात विस्तारलेले आहे. कालव्याने एकमेकास जोडलेले आहे. व्हेनिस येथे जमीन खाली, समुद्र वर अशी अवस्था असल्यामुळे समुद्रापासून त्याचे संरक्षण लांब, निमुळत्या अशा वाळूच्या व दगडाच्या बांधाने केलेले आहे. व्हेनिस जे कालवे आणि बेटामुळे तयार झालेले आहे तेथील मुख्य जलमार्ग म्हणजे 'S' या आकाराचा ग्रँडकॅनाल जो दोन मैल लांब व २२८ फूट रुंद आहे या ग्रँडकॅनालला शहरातील लहान मोठे भूभागालगतचे असे १८० छोटे मोठे कालवे जोडलेले आहेत. ह्या कालव्यावर ३८० पूल आहेत. एक गल्लीतून दुसऱ्या गल्लीत जायचे असल्यास कालव्यावरील पूलावरून जावे लागते. काही ठिकाणी तर दोन वेगवेगळ्या घरात जायचे असल्यास छोट्या कालव्या वरील लहानश्या पुलावरून संपर्क साधावा लागतो.



व्हेनिसमध्ये दोन भूभागात असणारे कालवे व त्याना जोडणारे कमानीसारखे पूल व त्या पुलाखालून कालव्यातून जलविहारसाठी जाणारी बोट. या पार्श्वभूमीवर छायाचित्रात लेखक व इतर वनस्पतिशास्त्रज्ञ.

छोट्या छोट्या होड्यातून येथील वाहतूक होते. येथे साधारणपणे जलविहाराचे साधन म्हणजे गोंडाला बोट. जिचा तळ सपाट असून दोन्ही बाजूस निमुळती होत जाते. गोंडाला या दोघाच्याच होडीतून जलविहार करण्याची मजा तर औरच आहे. सर्वच शहर रोमॅन्टिक वाटते. अशा ह्या शहराचे हवामान जानेवारीत अतिथंड व जुलैत अतिशय उष्ण. एरवी हवा सौम्य, आल्हादायक वाटते.

हे सुंदर शहर १५व्या शतकात अॅड्रीअॅटीकच्या समुद्र किनाऱ्याच्या सपाट चिखलाच्या प्रदेशात अॅटीला द हून (Attik The Hun ) याने वसविले. व्हेनिस ही तसे ऐतिहासिक महत्त्वाचे शहर. पुराणे इतिहास सजीव झाल्याचा भास होतो. प्राचीन काळी हे युरोपातील व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र होते. येथून अतिपूर्वेकडे जलमार्गाने व्यापाराच्या मालाची ने आण व जल वाहतुकीसाठी केली जात असे. मध्य युगातील प्रबोधन काळात हे श्रीमंत शहर 'अॅड्रिअॅटीकची राणी' म्हणून गौरविले होते. प्राचीन इमारतीची रेलचेल आहे. येथे सर्व प्रथम आकर्षित करणारी

वास्तू म्हणजे १०व्या शतकात बांधलेली फिकट हिरव्या रंगाचा ३२५ फुट उंचीचा क्लॉक टॉवर (घंटाघर) मनोरा ! हा मनोरा खालील बाजूस चौकोनी असून वरच्या बाजूस निमुळता होत जातो. हे क्लॉक टॉवर 'मनोरा' १४ जुलै १९०२ ला कोसळला होता. परंतु व्हेनिसच्या लोकानी त्याला पुन्हा पूर्ववत उभे केलेले आहे. या क्लॉक टॉवरच्या मागील बाजूस एक भला मोठा ऐतिहासिक प्रसिद्ध असा महत्त्वाचा चौक आहे. तो म्हणजे विख्यात सेंट मार्क स्क्वेर! त्याला व्हेनिसचे ह्रदय असे संबोधले जाते. फिक्या अग्निज्यन्य खडकापासून व संगमरवराने हा प्रशस्त चौक बांधलेला आहे. फ्रांसचा सम्राट नेपोलियन बोनापार्टने येथे भेट दिल्यावर त्याचे वर्णन त्याने 'जगातला सुंदर दिवाणखाना' असे केले. या चौकास भेट दिली की असे सांगण्यात आले की सेंट मार्क स्क्वेअरचे बांधकाम सेंट मार्क नावाच्या महान मानवतावादी व्हेनिसच्या संताच्या शवाचे दफन करण्यासाठी केले होते. सेंट मार्कचे देहावसन झाल्यावर त्याने शव दोन व्यापाऱ्यांनी इजीप्तमधून पळवून आणले होते. हे शव अनेकदा काढले गेले तसेच पुन्हा पुरले गेले. सध्या मात्र ते शव या सेंट मार्क स्क्वेअरच्या जवळच असलेल्या सेंट मार्कसकॅथड्रोल (बॅसिलीका) मध्ये एका उंचवट्यावर चिरविश्रांती घेत आहे.



`उंच क्लॉक टॉवर, सेंट मार्कस् स्क्वेअर, पाच गोल गाभारे (Dome) असलेले सेंट मार्कस् कॅथेड्रल (बॅसिलीका) फाईन आर्टस म्युझियम.

या कॅथोड्रेल मध्ये पाच उंच असे गाभारे (Dome) आहेत. ते बायझंटाईन शैलीत संगमरवरात बांधलेले आहे. त्याच्या दरवाज्याच्या मध्यभागात ब्रॉंझचे चार भव्य घोडे आहेत. या सेंट मार्कस् बॅसिलीकाचे बांधकाम ११व्या शतकातले असून ते सोन्याच्या व कांचेच्या तुकड्याने मढविलेले आहे.

मार्कस् स्क्वेअर मधील कबुतरे !

या मार्कस् स्क्वेअरचे खास वैशिष्ट्य म्हणजे तेथे सदोदित असंख्य कबुतरांचे थवे वागडत असतात. एकट्या व्हेनिस मध्ये सुमारे १ लाख वीस हजार कबुतरे आहेत. तसे कबुतरे हे व्हेनिसचे अविभाज्य अंग आहे. कबुतरे नसतील तर व्हेनिसची अवस्था पाण्याशिवाय राहणाऱ्या मासोळी सारखी होईल. आपल्याकडे तीर्थ क्षेत्री जशी माकडे धीटपणाने यात्रेकरू जवळ जाऊन जवळिक करतात, त्यांच्या हातांतील खाण्याच्या वस्तू हिसकावून घेतात तशी मार्कस् स्क्वेअर कबुतरे पण चांगलीच धीट आहेत. पर्यटक या कबुतरांना खायला देणे घालतात व त्यांना आपल्या अंगा खांद्यावर , किंवा हातात धरून त्याच्यासमवेत फोटो काढून घेतात. ही कबुतरे इतकी माणसाळली आहेत की जणु काही ही आपली जिवलग आहेत असे वाटते. अशा या मार्कस् स्क्वेअर मधील व व्हेनिसचा इतर भागांतील कबुतरांवर सध्या एक भलतीच जीवघेणी आफत आली आहे. ती म्हणजे व्हेनिसच्या महापौरानी कबुतराच्या निर्मूलनाचा काढलेला फतवा ! बरीच अशी आजारी कबुतरे एक खास प्रकारचा जीवाणू (Bacteria) वाहून नेतात. त्यामुळे माणसास अंधत्व प्राप्त करून देणारा 'ट्रॅकोमा, नावाचा रोग होतो. तसेच ह्या कबुतरांचा विष्ठा वर्षाव ही पण एक उपद्रवाची बाब झालेली आहे. त्यामुळे कबुतरांना पकडून मारुन टाकण्याचे आदेश व्हेनिसच्या महापौरानी दिले तेव्हा पक्षीप्रेमी संघटनांनी कबुतरांना पकडून ठार मारण्यास कडाडून विरोध केला. तो विरोध इतका तीव्र होता की त्यांनी कबुतराची लुटपुटूची प्रेत यात्रा काढून एक मोठा मोर्चा काढला होता. काही संघटना तर महापौरांच्या आदेशाविरुद्ध

कोर्टात पण गेल्या आहेत. त्यावर तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर असणारे व्हेनिसचे महापौर श्री. कॅसियारी यानी पण सर्व संबंधिताना तात्विक भाषेत सांगितले की माझ्यावर खटले भरु नका किंवा माझ्या निषेधाच्या भानगडीत पडू नका. कारण कबुतरे अंधत्वाच्या आजारामुळे मानवी आरोग्याचे जेवढे नुकसान करतील, त्यापेक्षा कोर्टबाजी व माझ्या निषेधाच्या निवेदनाने कमीच नुकसान होईल. आपल्या शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या रक्षणाची जबाबदारी माझ्यावर आहे. ती जबाबदारी मी पार पाडणारच ! पक्षीप्रेमी या महापौराच्या उत्तराबर पार संतापले पण बहुसंख्य म्हणजे ७९.९ टक्के नागरिकांनी महापौरांच्या कबुतर निर्मुलनाच्या मोहीमेस मनःपूर्वक पाठिंबा दिला आहे. तर २० टक्के नागरिकांनी सांगितले कबुतराचे कुटुंबनियोजन करून हा प्रश्न सोडवावा. काहीही होवो, एकतर कबुतरांची संख्या कमी होईल पण व्हेनिसचा रस्ता, मार्कस् स्क्वेअरच्या चौकात कबुतरे बागडत राहतील नि आकाशात विहरतच राहतील, नाहीतर कबुतराशिवाय व्हेनिस सुने सुने होईल.

अशा या विशाल मार्कस् स्क्वेअरच्या एका बाजूला अप्रतिम डुकाल संग्रहालय (Museum )व कलादालन म्हणजे आर्ट गॅलरी आहे. या चौकाच्या एका बाजूस गुलाबी व पांढऱ्या संगमरवराने गॉथिक शैलीत १३०९ मधे बांधलेला पॅलेस आहे, तो म्हणजे 'पॅलेस ऑफ डॉजेस्' (Palace of Doges )ह्या पॅलेसच्या जवळच्या बाजूस कालव्याजवळ १६व्या शतकात बांधलेला तुरुंग आहे. येथील मार्कस् स्क्वेअरच्या जवळ असलेल्या कलादालनास (Fine art Museum )व संग्रहालयास भेट दिली असता तेथे इतिहास कालीन हस्तलिखिते, पुस्तके तसेच अत्यंत दुर्मिळ अशा वस्तू संग्रहित करून ठेवलेल्या आहेत. प्रबोधनकाळात तिशिअन( Titian), बेल्लीनी, टीन्टोरेट्टो, इ. चित्रकारांच्या कुंचल्यानी सजीव झालेली चित्रे जणू काही भेट देणाऱ्या पाहुण्यांशी हितगुज करतात की काय इतके चित्त वेधून घेतात.

व्हेनिस हे फ्लोरेंस प्रमाणे प्रबोधनकाळांतील कलानिर्मितीचे केंद्र होते. येथे याकोपो सान्सोव्हीनोने (१४८६-१५७०) उभारलेले ग्रंथालय व कलादालन (Fine art Gallery ) घडविले. या वास्तूच्या प्रत्येक मजल्याला वेगळी स्तंभशैली योजण्याचा संकेत त्याने पाळला पण भिन्न भिन्न शैलीचा वापर केला. नक्षीदार कपडे, फुलाच्या माळाच्या आकृती व इतर शिल्पे याचा प्रथम उपयोग करून घेतला. त्याची रचना व्हेनिसच्या गॉथिक शैलीतील वास्तुच्या दर्शनी भागावरील वेलबुट्टीची किंवा जाळीकामाची आठवण करून केते. येथेच व्हेनिसचा चित्रकार जोर्जोने याने 'द टॅपेस्ट' (The Tempest) हे चित्रफलकावर रेखाटलेले एक नमुनेदार चित्र लक्ष वेधून घेते. त्या चित्रात एक निसर्गदृश्य असून त्यात कमानी, पूल, नदीचा प्रवाह व ज्यातून वीजेचा कडकडाट अशा पावसाळी ढगाचे दर्शविले आहेत. आपल्या प्रतिभाशाली कुंचल्यातून रंगविलेल्या दोनच मानवाकृती म्हणजे एक मेंढपाळाची व दुसरी खांद्यावरील शालीव्यतिरिक्त दुसरे कोणतेही वस्त्र प्रवरण नसलेल्या व आपल्या बाळास जोजवणाऱ्या स्त्रीची आहे. या चित्रात हळुवारपणे रेखाटलेल्या मानवाकृतीशी त्या निसर्ग दृष्याचा भावनात्मक संवाद चित्रकाराने साधला आहे. ह्या कलारचनेच्या आशयाबाबत जरी मतभिन्नता असली तरी ही अतिशय श्रेष्ठ, दर्जाची मानली गेली आहे. व्हेनिसचे कलाकुसरीच्या वास्तुच्या बाबतीत विशेषतः काचेवर होणारा कला संस्कार जगप्रसिद्ध आहे. येथील भुरानो बेटावर काचेवर होणारे कोरीव काम तसेच काचेपासून उत्पादित झालेल्या अप्रतिम कलाकृती ह्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. क्रीस्टल ग्लास (Crystal Glass) पासून केलेल्या वस्तूवर सोन्याचा मुलामा दिला जातो. अस्मादिकांनी क्रिस्टल ग्लासचा एक सुंदर फ्लॉवर पॉट विकत घेतला. त्याची किंमत ३० डॉलर ! म्हणजे १३०० रुपये. इथल्या वस्तू महाग आहेत पण दुर्मिळ आहेत. तसेच या कलेवर जगणारे ही दुर्मिळ होत चालेले आहे.

(पान क्रमांक २५ वर)

# ग्राहक चळवळ व ग्राहक कायदा

प्रा. सौ. आशा अ. दातार

*(ग्राहक चळवळ ! ग्राहकाच्या मूलभूत हक्कांविषयी जाणीव निर्माण करणारी चळवळ. कायद्याच्या दृष्टीने या चळवळी विषयी - संपादक)*

॥ ग्राहक रक्षति रक्षतः ॥

'ग्राहक एक राजा । राष्ट्र देवो भव' देशाचा कायाकल्प करणे हा देशातील ग्राहक चळवळीचा एकमात्र हेतू आहे. जसा जसा व्यापार वाढत गेला तस तसे ग्राहक विक्रेते यांचे संबंधही बदलत गेले. दिवसें दिवस वाढत जाणाऱ्या या व्यापाराबरोबरच आज प्रत्येक क्षेत्रात ग्राहक नाडला जात आहे असे दृष्य दिसते. याचे महत्वाचे कारण म्हणजे ग्राहकाचा अज्ञानीपणा. आजचा ग्राहक हा अज्ञानी, एकाकी, आगतिक, शोषित, असंघटित आहे. याउलट ग्राहकांना नाडणारे लोक मात्र संघटित आहे व म्हणूनच वैयक्तिक व सामूहिक स्तरावर होणारी ही पिळवणूक व शोषण थांबविणे हे प्रमुख उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर त्यासाठी ग्राहक संघटित होणे अत्यंत आवश्यक आहे व म्हणून शोषणमुक्त, भ्रष्टाचार विरहित, नैतिक मूल्याधिष्ठित समाजरचना ही ग्राहक चळवळीची संकल्पना आहे, त्याच बरोबर उत्पादनात वाढ, वितरण, समानता आणि उपभोगावर संयम हे ग्राहक चळवळीचे विचारसूत्र आहे.

महाराष्ट्र ही ग्राहक चळवळीची जन्मभूमी आहे. चळवळ म्हटली की आपल्या सर्वांच्या मुखात एकच नाव येते ते म्हणजे आदरणीय, माननीय बिंदूमाधव जोशी, अध्यक्ष ग्राहक कल्याण उच्चाधिकार समिती.

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनडी यांनी १५ मार्च १९६३ या दिवशी एक विधेयक सिनेटमध्ये मांडले, व ग्राहक हिताचे रक्षण करण्यासंबंधी तेव्हापासून साऱ्या जगभर १५ मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक दिन' म्हणून साजरा होऊ लागला.

राष्ट्रवादी जागरुक ग्राहक काळाची गरज आहे. ग्राहक चळवळ ही खरेदीदारांची चळवळ नाही तर ती आर्थिक परिवर्तनाची चळवळ आहे. ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. अर्थव्यवस्थेतील ३ महत्त्वाचे घटक म्हणजे (१) उत्पादनात वाढ, (२) वितरणात समानता व (३) उपभोगावर संयम. ह्या सर्वांची नीट अंमलबजावणी होण्यासाठी व ग्राहकांच्या संरक्षणासाठी डिसेंबर १९८६ मधे 'ग्राहक संरक्षण कायदा' अस्तित्वात आला व राष्ट्रीय ग्राहक दिनाचा उदय झाला. हा एक समाज कल्याणाचा अद्वितिय कायदा आहे. हा एक क्रांतिकारक व ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणारा कायदा आहे. सदरहू कायद्याचा संबंध प्रत्येक नागरिकांशी येतो. कारण तो दैनंदिन जीवनात कोणत्या ना कोणत्या वस्तूंचा व सेवेचा ग्राहक असतो. कधी कधी वस्तू खरेदी करतांना त्यांची अनेक तऱ्हेने फसवणूक होते. कधी वस्तू सदोष असतात तर कधी त्यांची किंमत ठरलेल्या किंमतीपेक्षा जास्त आकारली जाते. हल्लीचे युग हे जाहिरातीचे आहे. आपल्या वस्तू खपविण्यासाठी काही उत्पादक फसव्या जाहिराती निरनिराळ्या प्रचार माध्यमातून देऊन गरज नसताना वस्तू खरेदी करण्याची इच्छा उत्पन्न करतात. वस्तू खरेदी केल्यानंतर काही ग्राहकांना आपली फसगत झाल्याचे लक्षात येते. कधी निर्धारित किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारली जाते तर कधी खरेदी केलेली वस्तू सदोष असते

व अशावेळी निर्माते ग्राहकांच्या तक्रारीची दाद घेत नाही त्यामुळे ग्राहकांचे जे मूलभूत हक्क आहे त्याचे संरक्षण व्हावे म्हणून जागतिक स्वरुपाची ग्राहक चळवळ निर्माण झाली आहे.ग्राहकांना न्याय मिळावा या गरजेतून ग्राहक संरक्षण कायदा करण्यात आला. हा कायदा पूर्णपणे स्वायत्त: ग्राहक चळवळीने म्हणजे सामान्य ग्राहकांनी केला. ग्राहकांनी भारताच्या शोषणमुक्तीसाठी स्थापित केलेला हा कायदा आहे.

आजच्या प्रगत काळात नागरिकांना अनेक सेवांची गरज पडते. उदा. टेलिफोन, विद्युत, बँकिंग, वाहतूक, हॉटेल्स, विमा, वैद्यकीय, घर, बांधारे, बिल्डर्स इत्यादी अनेक ग्राहकांना उपलब्ध केलेल्या काही सेवेमध्ये त्रुटी आढळतात. कधी कधी सेवा सदोष असतात तर कधी कधी त्यात खंड पडतो व ग्राहक त्रस्त होतो व ग्राहकांना न्याय हवा असतो, आपल्या झालेल्या नुकसानाची भरपाई हवी असते व अशावेळी ग्राहक संरक्षण कायद्याने स्थापन केलेले मंच त्यांचे मदतीला येतात. व त्यांच्या तक्रारीचे निवारण करू शकतात. असा हा ग्राहकांचे मूलभूत हक्क जोपासणारा उपयुक्त कायदा आहे. देशात ग्राहक न्यायालये स्थापन होऊन अनेक न्याय निवाडे होऊन असंख्य पिडीत ग्राहकांना न्याय मिळत आहे. सर्वोच्च न्यायालयापासून ते जिल्हा मंचाने दिलेल्या निवाड्यावरुन हे सिद्ध झाले आहे. जिल्हा मंचाची कार्यप्रणाली Quasi Judicial ही आहे. सर्वसाधारणपणे जिल्हा मंचापुढे/आयोगापुढे आलेल्या तक्रारीचे, विरुद्ध पक्षाला नोटीस मिळाल्यापासून ९० दिवसांच्या आत निवारण व्हावे असे मार्गदर्शक तत्त्व या कायद्याखाली केलेल्या नियमांत अंतर्भूत आहे. तसेच कोणालाही न्यायालयीन फी-कोर्ट फी वा स्टँप फी लागत नाही. तसेच कोणताही वकील नेमण्याचे त्यांच्यावर बंधन नाही. जिल्हा मंचात ५ लाख रुपयापर्यंत दावे दाखल करता येतात, उपभोक्त्याला तक्रारी मांडण्यासाठी 'त्रिस्तरिय' व्यवस्था या कायद्याद्वारे करण्यात आली आहे. ५ लाख रकमेपर्यंतची तक्रार जिल्हा मंचापुढे मांडता येते. ५ ते २० लाखापर्यंत राज्य आयोगाकडे व त्यापुढील तक्रार राष्ट्रीय आयोगापुढे मांडता येते. जिल्हा मंचाच्या निर्णयावर राज्य आयोगाकडे अपील करता येते व राज्य आयोगाच्या निर्णयामुळे अन्याय झाल्यास राष्ट्रीय आयोगाकडे अपील करता येते. (३० दिवसांच्या आत) व राष्ट्रीय आयोगाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. निर्णयाची अंमलबजावणी-ग्राहकाच्या तक्रारीचा निर्णय दिल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा ग्राहक संरक्षण कायद्याचे कलम २५ व २७ प्रमाणे अधिकार आहे. २७ कलम खाली दोषी इसमास ३ वर्षापर्यंत कारावासात पाठविता येते, व १ महिना कारावास व कमीत कमी आहे. एवढी परिणमकारक तरतूद या कायद्यात आहे.

अशा प्रकारे वैशिष्ट्यपूर्ण तरतुदींनी युक्त असा हा कायदा जनतेला वरदान ठरलेला आहे.

प्रा. सौ. आशा अ. दातार

• • •


विद्या प्रसारक मंडळास

नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

**मुद्रण ग्राफीक्स**

**सर्व प्रकारच्या डी.टी.पी. व छपाईच्या कामांसाठी**

३०७/३०८, एकता अपार्टमेंट,
चरईक्रॉस, ठाणे (प.) ४०० ६०२.
फोन : ५४३ १७३४

मधुरा गोडबोले


हिरवा रंग ही झाडांच्या रूपाने देवाने माणसाला घातलेली शपथ आहे.

# व्यक्तिमत्त्व विकासाची प्रक्रिया

डॉ. अशोक जी. जोशी

*( व्यक्तिमत्त्व विकास ! आजचा परवलीचा विषय . या विषयाच्या अनुषंगाने केलेले चिंतन या लेखात आढळेल. - संपादक)*

व्यक्तिमत्त्व विकासाच्या प्रक्रियेतील महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या अंगी असलेले गुण वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील रहाणे. त्याचबरोबर आपले दोष आणि मर्यादा ओळखून भावी काळामध्ये हे दोष कमी कसे करता येतील यासाठी प्रयत्न करणे ही व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रक्रियेतील एक अतिशय महत्त्वपूर्ण अशी बाब मानली पाहिजे.

ही प्रक्रिया प्रभावीपणे करण्यासाठी आपल्याला पुढील गोष्टी करता येतील. एक कोरा कागद घ्यावा व त्याचे दोन भाग पाडावेत. कागदाचे डाव्या बाजूला आपल्या अंगी असलेले गुण प्रामाणिकपणे एका खाली एक असे लिहावेत, व कागदाच्या उजव्या बाजूस आपल्या अंगी असणारे दोषही प्रामाणिकपणे लिहावेत, असे केल्यानंतर आपल्या जवळच्या मित्राला अगर मैत्रिणीला तो कागद दाखवावा, आणि लिहिलेले गुण व दोष योग्य आहेत का ? ते ताडून पाहावे. त्या जवळच्या व्यक्तीने आपले काही गुण अथवा दोष नव्याने आपल्या निर्दशनास आणले तर त्याचाही अंर्तभाव आपण केलेल्या गुण-दोषांच्या यादीमध्ये करावा. असे केल्यानंतर आपल्या अंगी सर्वात चांगला गुण कोणता ? याचा अंदाज घेऊन त्या गुणाखाली एक रेघ ओढावी व तो गुण आपले हे सामर्थ्य आहे हे समजून गुणामध्ये वाढ अथवा विकास साधण्याचा मनापासून सतत प्रयत्न करावा. उदा. एखाद्या व्यक्तीमध्ये चांगले गाणे म्हणण्याचा गुण असेल तर आपला आवाज अधिक चांगला करून आपली गायनकला अधिक विकसित कशी करता येईल याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. एखाद्याला लोकसंग्रह अधिक प्रभावी कसा करता येईल व जनसंपर्क कसा वाढवता येईल याकडे सर्व लक्ष दिले पाहिजे, व आपल्या अंगी असलेल्या गुणांचा जास्तीत जास्त फायदा करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या उलट आपले दोष कोणते आहेत हे लक्षात घेऊन हे दोष आपल्याला कसे कमी करता येतील ? ते कमी करण्यासाठी आपल्याला काय करता येईल ? याचाही साकल्याने विचार करावयास हवा, व अंतिमतः हे दोष कसे संपविता येतील याचा देखिल विचार केला पाहिजे.

आपल्यातील दोष दूर करतांना बऱ्याच वेळा वस्तुनिष्ठ स्वरुपाचे आत्मनिरिक्षण करावे लागते. स्वतःचे अंगी विशिष्ट दोष आहेत हे मोकळेपणाने मान्य करावे लागते, व ते स्वीकारावे लागते व असे केले तरच आपल्यातील दोष दूर करण्यासाठी आपण निश्चितपणे पावले उचलू शकू. हे दोष दूर करण्यासाठी प्रसंगी कठोर स्वरुपाचे निर्णय घ्यावे लागले तरी ते घेतले पाहिजेत अशी आपली भूमिका ठेवायला हवी.

आपल्यामध्ये काही दोष आहेत हे मान्य करायला बरेचदा आपण तयारच नसतो. आपल्या ऐवजी आपल्या एखाद्या सहकाऱ्याला प्रमोशन मिळाले की त्याचा अर्थ आपण असा लावतो की, प्रमोशन मिळण्यास आपणच पात्र व लायक होतो, परंतु आपला सहकारी हा आपल्या वरीष्ठांची चमचेगिरी करतो, त्यांच्या पुढे-पुढे करतो, किंवा आपल्या ऑफिसमध्ये अशीच वशिलेबाजी चालते, त्यामुळेच त्याला प्रमोशन मिळत नाही असा अर्थ लावून आपण मोकळे होतो व आपल्यातील दोषांकडे दुर्लक्ष करतो. दुसऱ्या कोणासही दोष देता आला नाही तर आपण परिस्थितीला अथवा नशिबाला दोष देतो व आपण सुर्वगुणसंपन्न आहोत परंतु नशीब आपल्याला साथ देत नाही

असे म्हणून स्वतःचे समाधान करतो.

स्वतःमधील गुण ओळखण्यासंदर्भामध्ये एक गोष्ट येथे नमूद करणे समर्पक ठरेल. एक सिंहाचा छावा लहानपणीच जंगलामध्ये चुकला, व तो मेंढ्या बकऱ्यांच्या एक कळपामध्ये आला व तेथेच तो लहानाचा मोठा होऊ लागला. त्याच्या सर्व क्रिया मेंढ्या-बकऱ्यांचे सहवासामध्ये त्यांच्या सारख्याच होऊ लागल्या. आपण एक सिंह आहोत याची त्याला जाणीवच राहिली नाही. असेच एके दिवशी जंगलामध्ये एका मोठ्या सिंहाने गर्जना केली व त्याने या मेंढ्याच्या कळपाला दर्शन दिले. अचानकपणे सिंह आलेला पाहताच मेंढ्यांचा कळप वाट फुटेल तिकडे पळत सुटला, हा सिंहाचा छावा देखील या कळपाबरोबर पळून गेला. पळून दमल्यानंतर मेंढ्या एका तलावापाशी थांबल्या व त्या तलावातील पाणी पिऊ लागल्या. या सिंहाच्या बछड्याने देखील तलावातील पाणी पिण्यास आरंभ केला. असे करताना त्याने अचानक तलावातील पाण्यात आपले प्रतिबिंब पाहिले. हे प्रतिबिंब पाहिल्यावर त्याच्या असे लक्षात आले की, यापूर्वी ज्या सिंहाला पाहून आपण सर्वजण पळालो, त्या सिंहासारखेच आपण दिसतो आहोत, व आपण मेंढी नसून खरेखुरे सिंहच आहोत हे त्याच्या लक्षात आले. हे लक्षात आल्यावर त्याला आत्मप्रचितीचा खराखुरा साक्षात्कार झाला व त्याने मान उंच करून सिंहासारखीच गर्जना केली. त्याने केलेली ही गर्जना ऐकून भोवतालच्या मेंढ्या बकऱ्या घाबरून पळून मग हा सिंहाचा छावा रुबाबदारपणे जंगलात निघून गेला. त्याने जेव्हा स्वतःला ओळखले तेव्हा त्याला आपल्यातील सामर्थ्याचा साक्षात्कार झाला व तो वनराज बनला.

अशाच प्रकारे आपण आपल्यातील सामर्थ्याचा अविष्कार स्वतःच घडवून आणला पाहिजे व स्वतःमधील गुण ओळखून आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाठी त्या गुणांचा उपयोग करून घेतला पाहिजे.

**डॉ. अशोक जोशी**
पर्सोनेल मॅनेजर, जेके फाईल्स व टूल्स, जेकेग्राम, ठाणे ४.

• • •

(पान क्रमांक २१वरून)

**मी पाहिलेली इटाली (पूर्वार्ध २)**

अशी ही रमणीय नगरी जिला निसर्गाने तर नटविले आहेच व निरनिराळ्या शिल्प शास्त्रज्ञांनी, चित्रकारांनी, कलावंतांनी इ. आपापल्या प्रतिभेच्या लेण्यांनी सुशोभित केले आहे त्या व्हेनिस नगरीच्या प्रेमात या २०व्या शतकांत महान कादंबरीकार ज्याने ओल्ड मॅन अँड सी सारखी महान कलाकृती ( जिचे पु.ल. देशपांडे यांनी ' एका कोळीयाने' असे भाषांतर केले आहे. ) निर्माण करून वाङमयाचे नोबेल पारितोषिक मिळविले, तो अर्नेस्ट हेमिंग्वे व्हेनिस नगरीवर पार भाळून गेला होता. हेमिंग्वे व्हेनिसच्या कॅफेत नियमित येऊन व्हेनिसचा आनंद उपभोगीत असे. तिथे हेमिंग्वे सारखा रसिकाग्रणी व्हेनिसनगरवर भाळला तिथे तुम्हा आम्हा सारखे लोक व्हेनिसवर का भाळणार नाहीत ?

**डॉ. ग. त्रिं. दाभाडे**
वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे ४०० ६०१.
दूरध्वनी : ५३३ ६५०७.

• • •

With Best Compliments From

A
Well
Wisher

# फेब्रुवारी २०००

**सौ. विशाखा देशपांडे**

हेमंतातील गुलाबी थंडी ! आल्हाददायक वाऱ्याच्या थंड झुळुका शिरशिरी जागवून जातात. मधेच पर्णहीन झाडांची, वाऱ्या बरोबर होणारी लयबद्ध हालचाल. फांद्यांच्या त्या लयबद्ध हालचालींबरोबरच सळसळत हिंदोळे खात खाली झेपावणारी पिवळी झालेली झाडांची उरली सुरली पाने. हिरव्या, पिवळ्या, निळ्या अशा संमिश्र घटांचे पंख पसरवत मंजुळ आवाज करणारे इवले इवले वजिंगर पक्षी. कचितच दिसणारा, पण दिसल्यावर दृष्टी सुखावणारा भारद्वाज ! संपूर्ण सृष्टीवर आपली हलकेच, हलुवार ओढणी पांघरणार धुकं. अशातच हवी हवीशी वाटणारी उन्हाची किरणं !

सारं वातावरण मंगलमय ! कोणत्या तरी दिशेने घुंगरांचे मंजुळ, लयबद्ध आवाज. कुठूनसे येणारे मधुर गाण्यांचे समूहगीतांचे स्वर, वाद्यांचे, टेपरेकॉर्डरचे आवाज. कुठल्याशा खिडकीतून ऐकू येणारे संवाद, भारावून जावून आजुबाजूला दृष्टी टाकावी तर, शाळा-कॉलेजाचा संपूर्ण परिसर उत्साहात नाचत-गात, येणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलना साठी जोमाने तयारी करत असताना दिसतो. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आले असतानाच, शिक्षक वर्गात पण तेवढाच उत्साह सळसळत असतो. सर्व जण आपापल्या परीने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी झटताना दिसतोय ! मित्रहो, सर्वांच्या परिश्रमाचे उत्साहाचे फळ म्हणजे, अत्यंत सुंदर, कल्पक असे स्नेहसंमेलन. या महिन्याची परिसर वार्ता हेच सांगतो.

**विद्या प्रसारक मंडळ**

दि. २६ जानेवारी रोजी सुवर्ण महोत्सवी प्रजासत्ताक दिन मंडळाच्या सर्व शाळा व कॉलेजांनी संयुक्तपणे कॉलेजच्या प्रांगणात साजरा केला. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांनी झेंडा वंदन केले. या वेळी एन.सी.सी., स्काऊट-गाईडचे विद्यार्थीविद्यार्थीनी यांनी व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी झेंड्याला सलामी दिली. मंडळाच्या सौ. ए.के.जोशी स्कूल व डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या विद्यार्थ्यांनी समूहगीते सादर केली. डॉ. वा.ना. बेडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले, की हल्लीचे दिवस असे आहेत की प्रत्येक नागरिकाने हरघडी सतर्क राहणे आवश्यक बनले आहे. या संदर्भात इतर छोट्या मोठ्या उदाहरणांबरोबर हल्लीच झालेल्या इंडियन एअर लाईन्सचे विमान अपहरण हे सतर्क न राहिल्याचे उदाहरण आहे, असे मत व्यक्त केले.

या प्रसंगी कॉलेजच्या एन.सी.सी. च्या उत्कृष्ट छात्रांना गौरव पदके प्रदान करण्यात आली.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर पूर्व प्राथमिक विभाग**

सौ. सुलक्षणा पाध्ये यांनी दिलेल्या माहितीनुसार -

२२ डिसेंबर १९९९ म्हणजेच दत्तजयंतीच्या दिवशी पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन झाले.



डॉ. बेडेकर विद्या मंदिर पूर्व प्राथमिक विभाग- वार्षिक स्नेहसंमेलन

हरवले गीत मिळे । आज अचानक पानांच्या जाळीत

या दिवशी प्रथम एका शिक्षिकेने स्वरचित केलेले ईशस्तवन व स्वागतगीत मोठ्या शिशुच्या मुलांनी मधुर आवाजात सादर केले. सर्व मुले व पालकवर्ग ते ऐकण्यात रंगून गेले होते.

कार्यक्रमाच्या पाहुण्या श्रीमती निर्मला वैद्य यांनी पूर्वप्राथमिक विभागातील मुलांना व त्यांच्या पालकांना अनुसरुन मोलाचे शब्द अतिशय छान सांगितले. नंतर मुलांच्या कार्यक्रमास सुरुवात झाली.

'आनंदी आनंद गडे' गाण्यात प्रत्यक्ष फुले व फुलपाखरे बागेतून चुकून स्टेजवर आलेत की काय असे वाटत होते.

कृष्णाला भेटण्यासाठी अतिशय उत्सुक झालेल्या गवळणी आपण रासगीतात बघितल्या.

उखाणागीतातून मुलांच्या बालबुद्धीला चालना मिळाली. पूर्वी कार्यक्रमातून किंवा चित्रपटातून ज्या प्रमाणे सवाल-जवाब असत, त्याच धर्तीवर हे उखाणागीत होते.

पऱ्यांच्या नाचात आकाशातून पऱ्या खरोखरच भूतलावर अवतरल्या आहे की काय असे भासत होते.

मुलांना शाळा, अभ्यास करुन कधीतरी कंटाळा येतो, पण ही चंदाराणी रात्रंदिवस आकाशात असते, तरी तिला कंटाळा येत नाही ? याचं मुलांना चंदाराणीच्या गाण्यात कुतुहल वाटत होत.

ठाकर जमातीचे लोक ऊन-पाऊस याला टक्कर देत आनंदाने रहातात. अतिशय कष्ट व अर्धपोटी राहूनही नाच,गाण्यांतून ते आपला आनंद व समाधान व्यक्त करतात.

कोळणी दर्यावर येऊन उसळत्या पाण्याजवळ जोशात नाचत जागर व गोंधळ हाही एक कार्यक्रम होता.

जपानी गीतही छान झाले. सगळ्यांना शेवटी सायोनारा करून स्नेहसंमेलानाचा हा गोड कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.

या सर्व कार्यक्रमासाठी शिक्षकांची अपार मेहनत, सेवकांची मदत आणि मुख्य म्हणजे पालकांचे उत्तम सहकार्य लाभले. शेवटी काय ! 'एकमेका साह्य करु, अवघे धरु सुपंथ!'

स्नेहसंमेलनातील सर्वच कार्यक्रम उत्तम झाले. तरीही आपले मंडळ शिक्षिकांना उत्तेजन देण्यासाठी लहान शिशुपैकी एक व मोठा शिशुपैकी एक असे दोन कार्यक्रम बक्षिसपात्र म्हणून जाहीर करते. त्यानुसार या वर्षी मोगरा गटाच्या लहान व मोठा शिशु या वर्गाच्या सौ. सुलक्षणा पाध्ये व सौ. सीमा केळकर या दोन शिक्षिकांना उत्तम संयोजनाचे पारितोषिक मिळाले.

तसेच २४-१२-९९ रोजी मुलांचे स्नेहभोजन होते. आजकाल जिकडे तिकडे बुफे पार्टीचा सुळसुळाट झाल्याने मुलांना हल्ली पंगत हा प्रकारच माहीत नाही. त्यासाठीच आम्ही मुलांची अंगत पंगत बसवली होती. दाराला तोरण, दारात रांगोळी, जुन्या पद्धतीचे रांगोळे आणून मुलांच्या पानासमोर सुंदर रांगोळी, पूर्वीसारखं बटाट्यात उदबत्त्या खोवून त्या लावल्या होत्या. उदबत्त्यांचा घमघमाट-सनईचा सूर असे रम्य वातावरण होते. शिवाय पानात भाताची सुंदर मुद त्यावर गोडं वरण, लोणकढं तूप, बटाट्याची भाजी, पुऱ्या व गुलाबजामचं पक्वान्न असा साग्रसंगीत बेत होता. सर्व शिक्षिका, सेविका मुलांना आग्रह करून वाढत होत्या. त्यामुळे मुलांना पंक्तीचा निर्भेळ आनंद मिळाला. म्हणूनच ही अंगत पंगत वैशिष्ट्यपूर्ण होती.

आमच्या विभाग प्रमुख सौ. वैद्यबाई यांच्या कल्पनेतून हा कार्यक्रम साकारला. त्याला सर्व शिक्षिका व सेविकांनी अतिशय उत्तम साथ दिली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभाग

सौ. विनोदिनी संजय राणे यांनी दिलेल्या माहिति नुसार-

प्राथमिक विभागात इयत्ता १ली ते इयत्ता ४थी च्या इयत्तेनुसार वेगवेगळ्या क्रीडास्पर्धा डिसेंबर महिन्यात घेण्यात आल्या. मंगळवार दि. २१-१२-९९ रोजी 'वार्षिक क्रीडा' स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ शाळेच्या वेळातच झाला.

इ. ३ री व ४थी च्या क्रीडा स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्या माजी मुख्याध्यापिका सौ. स्मिता महाडीक बाई ह्यांच्या शुभहस्ते पारितोषिके देण्यात आली. तसेच इ. १ली व इ. २री च्या क्रीडा स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्या माजी मुख्याध्यापिका सौ. नलिनी जोशी बाई ह्यांच्या शुभहस्ते पारितोषिके देण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे व व्यायामाचे तसेच सकस आहाराचे महत्त्व सांगितले.

दिनांक २३-१२-९९, गुरुवार रोजी प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन विद्यालंकार हॉल येथे साजरे करण्यात आले. स्नेहसंमेलनाचे अध्यक्षस्थान डॉ. वा.ना. बेडेकर यांनी भूषविले तर प्रमुख पाहुण्यांचे स्थान प्रसिद्ध स्त्री रोग तज्ज्ञ व आपल्याच शाळेच्या माजी विद्यार्थिनी डॉ. सौ. उल्का नातू ह्यांनी गौरविले.

प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. सुलभा दांडेकर यांनी कार्यक्रमाला प्रास्तविकाने सुरुवात केली. व वार्षिक अहवालाचे वाचन केले. यंदा विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. अ.धो. टिल्लू यांनी वयाची ६० वर्षे पूर्ण केली. त्या निमित्ताने सौ. दांडेकर ह्यांनी श्री. टिल्लू ह्यांना नाण्यापासनू बनविलेला मोर व भेटवस्तू देऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले. कार्यक्रमात अध्यक्ष व प्रमुख पाहुण्या यांनी अत्यंत मोलाचे विचार मांडले.



श्री. अ.धो. टिल्लू यांनी वयाची ६० वर्षे पुर्ण केल्या निमित्ताने सौ. दांडेकर ह्यांनी श्री. टिल्लू ह्यांना नाण्यापासनू बनविलेला मोर भेट म्हणून दिला.



डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभाग प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. उल्का नातू आपले विचार मांडताना.

१९९८-९९ या शालेय वर्षात अभ्यासक्रमात गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. प्राथमिक विभागाच्या शिक्षिका सौ. सीमा रजपूत ह्यांना ह्या वर्षीचा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पारितोषिक वितरण समारंभानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक व करमणूकीचे कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमातून अनेक विद्यार्थ्यांनी आनंदाने व उत्साहाने सहभाग घेतला. इयत्ता १ली च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला 'एक शाम शहीदोंके नाम' हा कार्यक्रम सर्वोत्तम ठरला. तसेच इयत्ता ३रीच्या विद्यार्थीनींचा 'हासता, नाचता' व विद्यार्थ्यांचा 'कृष्ण माझा सखा' कार्यक्रम विशेष उल्लेखनीय ठरले.

आपल्या पाल्यांच्या अंगी असलेले गुण पाहण्यासाठी ह्यावर्षीच्या स्नेहसंमेलनात पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहिला होता.



**डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभाग-
वार्षिक स्नेहसंमेलन**

दिनांक २४-१२-९९ शुक्रवार रोजी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना अल्पोपाहर देण्यात आला.

दिनांक १०-१-२०००, सोमवार ह्या दिवशी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना 'स्लाईड शो' दाखविण्यात आला. इयत्ता १ली व इयत्ता २री च्या विद्यार्थ्यांना 'इसापनीती' मधील काही गोष्टी दाखविण्यात आल्या. तर इयत्ता ३रीच्या विद्यार्थ्यांना 'माणसाची गोष्ट' व इयता ४री च्या विद्यार्थ्यांना 'राजा शिवाजी' ह्या गोष्टी दाखविण्यात आल्या.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभाग, ठाणे

❖ घंटाळी प्रबोधिनीने १४ वर्षाखालील विद्यार्थ्यांसाठी घंटाळी चषक १९९९ क्रीकेट स्पर्धा आयोजित केली होती. यात सलामीच्या लढतीत गतवर्षीच्या विजेत्या श्री माँ बालनिकेतनच्या संघाचा डॉ. बेडेकर विद्या मंदिरने ५ गडी व १५ षटके राखून पराभव केला. या सामन्यात ३८ धावात ७ बळी व ४९ धावा काढणाऱ्या उदय जोशी (९ब) याची 'सामनावीर' म्हणून निवड झाली.

❖ दि. २ डिसेंबर ९९ च्या 'बुगी वुगी' या सोनी वाहिनीवरील नृत्याच्या कार्यक्रमात कु. श्रुती मुकुंद जोगळेकर (९क) हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक रु. ३०००/- व प्रमाणपत्र प्राप्त झाले.

❖ 'ग्रंथली' ने ठाण्यातील बालकवी या मुलांनी केलेल्या कवितांच्या पुस्तकासाठी 'कवितांवरून चित्रे' अशी अभिनव स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत अश्विनी डहाळे (९अ) मधुरा कदम (९अ) कोमल कुंटे (९ब) यांच्या चित्रांची निवड झाली.

❖ 'ग्रंथाली'नेच 'कवितांचा कारखाना' हा नवीन उपक्रम आयोजित केला होता. यात चित्रांवरून कविता करण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली. यासाठी आपल्या शाळेतील कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी काढलेली चित्रे निवडण्यात आली. जवळ जवळ ५० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. याच दिवशी पाठ्यपुस्तकातील कविताही सामुहिक रीतीने म्हणण्यात आल्या.

❖ रवि. दि. ५ डिसें. ९९ रोजी आपल्या शाळेतील 'स्केचिंग क्लब' तर्फे अक्षरलेखनाचे शिबिर आयोजित करण्यात आले. यासाठी सुप्रसिद्ध सुलेखनकार श्री. अच्युत पालव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी देवनागरी लिपीतील अक्षरलेखन कसे करावे याचे शास्त्रशद्ध प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संयोजन सौ. मंजिरी दांडेकर

चित्रकार जणू होऊन हाती। निसर्गावर फिरवी कुंचला

यांनी केले होते. आपल्या माजी कलाशिक्षिका सौ. सविता आठवले याही या उपक्रमास उपस्थित होत्या.

❖ दिनांक २१,२२, २३ डिसेंबर ९९ रोजी या कालावधीत शाळेचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते.

❖ इ. ५वी साठी पालक शिक्षक संघाचे सभासद श्री. सुरेश पाखरे व आपली माजी विद्यार्थीनी सौ. मधुगंधा काळे-काटकर हे पाहुणे म्हणून लाभले होते. श्री. पाखरे यांनी आपल्या भाषणात अभ्यास कसा करावा ? त्याचे नियोजन कसे करावे ? या बद्दलचे विचार मांडले. श्री. पाखरे यांच्या पाल्यास (विनायकप्रसाद) आपल्या माजी विद्यार्थ्यांस राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

❖ सौ. मधुगंधा काळे-काटकर यांनी शाळेने प्रमुख पाहुणी म्हणून निमंत्रित केल्याबद्दल शाळेचे व मंडळाचे आभार मानले. आपल्या आत्तापर्यंतच्या वाटचालीत शाळेतील संस्कार कसे उपयोगी पडले ते सांगून विद्यार्थ्यांना जादूच्या प्रयोगाचे प्रात्यक्षिकही दाखवले.

❖ इ. ६वी साठी कथाकथनकार गौरव देशमुख याला प्रमुख पाहुणा म्हणून निमंत्रित केले होते. हा विज्ञान शाखेचा विद्यार्थी आहे. याने आपल्या भाषणात आपले अवांतर वाचन या कलेसाठी कसे उपयोगी पडले ते सांगितले. त्याला वाचन, कॅसिओ वाजवणे, कथाकथन करणे असे छंद आहेत. यासाठी घरातून भरपूर प्रोत्साहन मिळते हा महत्त्वाचा भाग.

❖ इ. ७वी साठी आपल्या शाळेचे माजी विद्यार्थी व सध्या एस्सेल वर्ल्डचे मॅनेजर असलेले श्री. शिरीष देशपांडे हे प्रमुख पाहुणे होते. आपल्या भाषणात ते म्हणाले, ' कोणतेही उच्च शिक्षण घेताना शाळेतील संस्कार व ज्ञान यांचा उपयोग झाला. शिक्षक जे कांही सांगतात ते आपल्या हितासाठीच असते. त्यांनी मनावर बिंबवले ते आजपर्यंत उपयोगी पडले व पुढेही पडेल'.

❖ इ. ८वी साठी ठा.म.पा. स्थायी समितीचे श्री. पाटणकर यांना पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. ते म्हणाले,'शाळेतील स्वच्छतेच्या सवयी किंवा शाळेत केलेले समाजोपयोगी काम, त्याची सवय, शाळेतील शिस्त ही आता काम करताना उपयोगी पडली.'

❖ इ. ९वी साठी प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त सिव्हिल सर्जन श्री. लंकेश्वर व सध्या कार्यरत असलेल्या सर्जन सौ. वाळंजकर यांना निमंत्रित केले होते. श्री. लंकेश्वर यांनी यापुढचे युग हे स्पर्धेचे, मानसिक ताणतणावाचे असेल व माणसाचे आयुष्यमान १०० वर्षापर्यंत असेल असे सांगून यासाठी उत्तम आरोग्य हवे व उत्तम आरोग्यासाठी व्यायामाची जरूरी आहे असे सांगितले.

सौ. वाळंजकर यांनी सध्या एकतर्फी प्रेमातून घडणाऱ्या हत्यांबद्दल खंत व्यक्त केली. त्याचबरोबर मुलींनी स्वसंरक्षणासाठी सिद्ध व्हावे व शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना लैंगिक शिक्षण द्यावे यावरही भर दिला.

इ. १०वी साठी प्रमुख पाहुण्या म्हणून आपली माजी विद्यार्थिनी, अंबरनाथच्या माजी नगराध्यक्षा सौ. पूर्णिमा कवरे या उपस्थित होत्या. आपल्याला इथे प्रमुख पाहुणी म्हणून निमंत्रित केल्याबद्दल शाळेतील शिक्षकांचे, मंडळाचे त्यांनी आभार मानले. आजवर इतके सत्कार, समारंभ झाले पण आजच्या सारखा सन्मान तो हाच. शाळेतील शिक्षकांनी केलेले संस्कार, दिलेला आत्मविश्वास हा नगराध्यक्षा म्हणून काम करताना फार उपयोगी पडला हे ऋण मान्य करून त्या पुढे म्हणाल्या की नगराध्यक्ष म्हणून लाभणारा कालावधी हा कमी असतो, पण त्या कालावधीत आपण किती कामे करतो यावरून त्याचे यशापयश अवलंबून असते. परत एकदा शाळेचे आभार मानून या कार्यात आपण यशस्वी झाल्याचे त्यांनी सांगितले.

याच कार्यक्रमात मार्च ९९ मध्ये झालेल्या शालांत

परीक्षेतील गुणवत्ता यादीत चमकलेल्या व शाळेत पहिल्या १० क्रमांकात आलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला तसेच आपल्या शाळेतील मुख्या. सौ. सविता केळकर यांना टिळ्ळू पारितोषिक प्रदान करण्यात आले.

❖ ठाण्यातील आऊटडोअर ॲडव्हेंचर्स ही संस्था नवनवीन साहसी मोहिमा आयोजित करून यशस्वी करते. याचे नेतृत्व शिव छत्रपती पुरस्कार विजेते श्री. प्रदीप केळकर हे करतात. यांच्याच नेतृत्वाखाली लोणावळा येथून ३१ डिसेंबर ९९च्या मध्यरात्री ४० गिर्यारोहकांनी कडा उतरण्यास सुरुवात केली व यशस्वीरीत्या उतरले. त्यात आपल्या शाळेतील प्रणव केळकर (५अ) हाही सहभागी होता. याची दखल ठाणे अंतरंगने घेऊन त्याचे अभिनंदन केले.

❖ दि. ९ जानेवारी २००० रोजी नाट्यभिमानी कै. शशी जोशी, स्मृती चषक वैयक्तिक अभिनय स्पर्धा घेण्यात आली. यात आपल्या शाळेतील कु. कादंबरी महेश शेंडे (५अ) हिला प्रथम क्रमांकाचे रु. ३००/ - चे पारितोषिक, चषक व प्रशस्तीपत्रक प्राप्त झाले.

❖ दै. लोकसत्ता प्रबोधिनीतर्फे घेण्यात आलेल्या सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत आपल्या शाळेतील कु. चेतन बाळासाहेब देशमुख (१०ब) यास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

❖ दि. ११ जानेवारी २००० रोजी इ. ५वी, ६वी व १०वी ची सहल एस्सेल वर्ल्ड येथे गेली होती.

इ. ७वी व ८वी ची सहल महाबळेश्वर येथे तर ९वीच्या एन्.सी.सी. चा कॅम्प मामणोली येथे नेण्यात आला.

❖ वन्यजीव सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत इ.५वी, ७वी व ९वी तील विद्यार्थी सहभागी झाले होते.

(सौ. मंजिरी दांडेकर कडून)

## तंत्रनिकेतन वार्ता - 'पॉलिझीन ' प्रकाशन समारंभ



श्री. निरगुडकर पॉलिझीन चे प्रकाशन करताना.

" आधुनिक तंत्रज्ञानात विद्यार्थ्यांनी मागे पडता कामा नये. जगाबरोबरच चालले पाहिजे. तसेच औषधाच्या expiry date चे उदाहरण देऊन त्यांनी आपले ज्ञान सतत अद्ययावत ठेवावे ." हे उद्गार आहेत श्री. उदय निरगुडकर यांचे. ते ॲपटेकचे व्हाईस-प्रेसिडेंट आहेत. ते विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या 'पॉलिझीन' या वार्षिकाच्या प्रकाशन समारंभात प्रमुख पाहुणे होते.

समारंभाची सुरुवात दीपप्रज्वलाने झाली. नंतर कु. दीप्ती देशमुख व विद्या कुलकर्णी, अनिता सिंदूर यांनी ईशस्तवन सादर केले.

श्री. निरगुडकर यांच्या हस्ते शैक्षणिक पारितोषिके विद्यार्थ्यांना दिली गेली. या पारितोषिकांचे वाचन प्रा. सौ. पाध्ये यांनी केले. तसेच कु. सचिन सालेकर या विद्यार्थ्याने 'पॉलिझीन' साठी घेतलेल्या स्पर्धांच्या पारितोषिकांचे वाचन केले.

या नंतर तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. मुजुमदार यांनी वार्षिक घडामोडींचा अहवाल सादर केला. विद्या प्रसारक मंडळ व या समारंभाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी मार्गदर्शन पर भाषण केले. व त्यांत श्री. निरगुडकर हे विद्या

प्रसारक मंडळाच्या विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी होते असे सांगून त्यांचे कौतुक केले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. सौ. शुक्ल यांनी करून दिला. पॉलिझीनच्या संपादिका प्रा. सौ. गुप्ते यांनी आभार प्रदर्शन केले. त्याआधी श्रीधर पेंडसे या विद्यार्थ्याने स्वरचित काव्यातूनही आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन समीर इनामदार या विद्यार्थ्याने केले.




**पॉलिझीन प्रकाशनाचा समारंभ**

सदर समारंभास विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर व कार्याध्यक्ष श्री. अ.धों. टिल्लू व अन्य माननीय पदाधिकारी उपस्थित होते. विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सी.जी. पाटील व ग्रंथपाल श्री. मोहन पाठक हेही या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहिले होते. तंत्रनिकेतनाचे उपप्राचार्य श्री. नायक, विद्यार्थीवर्ग व सर्व स्टाफ उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सांगता प्रा. सौ. आगाशे व श्री. गोडसे यांनी 'पसायदान' गाऊन केली.

**तंत्रनिकेतनातील ISTE कार्यक्रमांचा अहवाल**

**(सेक्रेटरी सौ. उषा राघवन यांजकडून)**

❖ ७-८-९९ रोजी ISTE चॅप्टरचे उद्‌घाटन प्राचार्य मुजुमदार यांनी केले. थोडक्यात ISTE बद्दल माहिती व वेगवेगळे कार्यक्रमाच्या विषयी त्यांनी आपल्या भाषणात चर्चा केली.

❖ २-९-९९ या दिवशी विद्यार्थ्यांचा प्रेसिडेंट ISTE चॅप्टर साठी निवडला गेला. तृतीय वर्षातील इलेक्ट्रिक पॉवर सिस्टिमचा आरिफ सय्यद हा प्रेसिडेंट म्हणून निवडला गेला. फॅकल्टी ॲडव्हायझर म्हणून सौ. आगाशे, व्ही.ऐ.जोशी, श्री. ओक, सौ. कुलकर्णी व श्री. नागराळे हे काम बघणार आहेत.

❖ १६-९-९९ रोजी श्री. विजय व्ही. जोशी माजी प्राचार्य जे.जे. स्कूल ऑफ आर्टस् यांनी स्टुडंटस् चॅप्टरचे उद्‌घाटन केले. " Importance of modern Communication Techniques" या विषयावर त्यांनी भाषण केले.

❖ १६-१०-९९ या दिवशी " Experience of Enterpreneur" या विषयावर कार्यक्रम आयोजित केला होता. श्री. अजित परांजपे डायरेक्टर लॅब इंडिया व श्री. सी. एस्. राठी, मॅनेजिंग डायरेक्टर, ॲडव्हान्स बायोकेमिकलस् यांनी विद्यार्थ्यांसाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

❖ २७-९-९९ या दिवशी " Art of living " या विषयावर मिस् प्रतिभा अय्यर व सुषमा आगरकर यांनी भाषण केले.

❖ २०-१०-९९ श्री. जोगळेकर मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह आयन एक्सचेंज यांनी "Ion exchange treatment for Industrial Wastes & Waste Water" या विषयावर भाषण केले.

❖ १७-१२-९९ " Industrial Automataion Softwares " या विषयावर एक सेमिनार आयोजित केले होते. श्री. नवीन नगम, डायरेक्टर, KVN सॉफ्टवेअर कन्सल्टंटस्, श्री. श्रीधर संपत मॅनेजर ERP आणि श्री. मिलिंद कोळी मॅनेजर, ट्रेनिंग आणि ई-कॉम यांनी या सेमिनार मधून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केले.

❖ २९-१२-९९ "Our Universe" या विषयावर स्लाईड शो आयोजित केला होता. श्री. मुकुंद मराठे यांनी आपल्या खुमासदार शैलीत तो सादर केला.

**प्रा. सौ. किर्ती आगाशे यांच्या कडून मिळालेल्या माहिती नुसार -**

'नेमेचि येतो मग पावसाळा' या चालीवर दरवर्षी डिसेंबर जवळ येऊ लागला की स्नेहसंमेलनाचे वारे वाहू लागतात. प्रत्येक वर्षी कार्यक्रमात नाविन्य आणण्याचा सांस्कृतिक मंडळाचा प्रयत्न असतोच. या वर्षी 'वृक्षारोपण' या कार्यक्रमाने २७ डिसेंबर १९९९ रोजी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले. तंत्रनिकेतनाच्या तिसऱ्या इमारतीखालील छोट्या मोकळ्या जागेत. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. वा.ना. बेडेकर, उपाध्यक्ष श्री. करंदीकर व कार्याध्यक्ष श्री. टिळू तसेच प्राचार्य श्री. मुजुमदार यांच्या उपस्थितीत अशोक, सुरु यांसारख्या वृक्षांचे रोपण झाले. एकविसाव्या शतकात हे वृक्ष बहरले की नक्कीच २०व्या शतकाच्या शेवटच्या स्नेहसंमेलनाची साक्ष देतील. यानंतर 'रांगोळी स्पर्धा' तंत्रनिकेतनाच्या नवीन दृक्-श्राव्य सभागृहात (Audio-Visual Room) घेण्यात आली. संस्कार भारतीची रांगोळी, सायंकालीन देखावा, 'भारत हमको जान से प्यारा' चा संदेश देणारा ध्वज, साईबाबा अशा विविध विषयांतून या तंत्रनिकेतनातील भावी तंत्रज्ञांनी त्यांच्या अंगभूत कलांचा अविष्कार सादर केला. त्या दिवशी दुपारी फन फेअर मधे विद्यार्थ्यांनी तसेच तंत्रनिकेतनातील कर्मचारी वर्गांनी खेळ व खाद्यपदार्थांचे स्टॉल ठेवले होते. यातून उत्तम खेळ व खाद्यपदार्थांच्या स्टॉलसाठी बक्षिसे देण्यात आली.

२८ डिसेंबर १९९९ चा दिवस ठरवणार होता 'टाय किंग' आणि 'साडी किन' ! या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद होता. परिक्षकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना विजेत्या विद्यार्थ्यांनी हजरजबाबीपणे उत्तरे दिली. 'साडी क्विन' म्हणून अदिती चक्रवर्ती तर 'टाय किंग' म्हणून मनीष सुळे यांची निवड करण्यात आली. यानंतर लोकप्रिय 'अंताक्षरी' चा कार्यक्रम रंगला. नृत्य स्पर्धा २९ डिसेंबरला सकाळच्या सत्रात जल्लोषात पार पडल्या. पूर्व तयारीला थोडाच अवधी मिळूनही विद्यार्थ्यांनी नृत्यातही आपले कौशल्य सिद्ध केले. त्या नंतरच्या ज्या कार्यक्रमाबाबत सर्वांच्या मनात खूप उत्सुकता होती तो होता 'हसत खेळत' या कार्यक्रमात प्रथम वयाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या कॉलेजमधील ज्येष्ठ मंडळींचा सत्कार विद्यार्थी वर्ग व सांस्कृतिक मंडळातर्फे करण्यात आला. यात प्राचार्य श्री. मुजुमदार, श्री. टकले, श्री. लुकतुके, श्री. शेट्टी, श्री. पुराणिक, श्री. काळे, श्री. अंधारे व श्री. पोईरेकर यांचा समावेश होता. या वेळी या सत्कारमूर्तींनी आपल्या अनुभवातील अनेक हस्य आठवणी सांगितल्या. त्यानंतर तंत्रनिकेतनात किमान १० वर्षे कार्यरत असलेल्या प्राध्यापकांना रंगमंचावर पाचारण करून, विद्यार्थ्यांनी अनेक विषयांवर प्रश्न विचारले या प्रश्नांना मिस्किल उत्तरे देत प्राचार्य श्री. मुजुमदार, उपप्राचार्य श्री. नायक, ई.पी.एस्. विभागप्रमुख प्रा.सौ. वडेर व डॉ. सौ. जांबोटकर , प्रा. सौ. गुप्ते, प्रा. श्री. मोहिते -पाटील, प्रा. श्री. वालावलकर, प्रा. सौ. जोशी, प्रा. सौ. आगाशे, प्रा. सौ. शहातन, प्रा. सौ. कुलकर्णी , प्रा. सौ. इंगवले व त्यांच्या इतर सर्व सहकारी प्राध्यापकांनी हा कार्यक्रम नावाप्रमाणेच 'हसत खेळत' सादर केला. यावेळी प्राचार्य श्री. मुजुमदार यांनी एक अतिशय चांगली योजना विद्यार्थी वर्गापुढे ठेवली. ती म्हणजे ज्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचा खर्च परवडत नाही परंतु त्यांना शिकायची जिद्द आहे व अभ्यासातही चांगली प्रगती आहे अशा लायक विद्यार्थ्यांसाठी तंत्रनिकेतनातर्फे एक 'मदत फंड' चालविण्यात येणार आहे. तंत्रनिकेतनात सध्या काम करणाऱ्या सर्वांनी मिळून १७ हजार इतकी मोठी रक्कम जमवली आहे. त्यात ज्यांची इच्छा असेल त्यांनी यथाशक्ती मदत करून जास्तीत जास्त ठेव जमा करायची आहे. या ठेवीवरील व्याजातून दरवर्षी काही विद्यार्थ्यांना तंत्रनिकेतन आर्थिक मदत करेल. या कल्पनेचे सर्वजणांकडून जोरदार

स्वागत झाले याचे उदाहरण म्हणजे TY Chemical च्या मुलांनी आपल्या स्टॉलमधे झालेल्या फायद्याचे रु. १०१ लगेचच प्राचार्यांना या योजनेसाठी देऊ केले. इतकेच नाही तर संगीत स्पर्धेला परीक्षक असलेल्या, कॉमर्स कॉलेजमधील प्रा. अरुण जोशी यांनी परिक म्हणून मिळालेले मानधन पण या योजनेसाठी प्राचार्यांकडे पोचवले.

मनोरंजन व ज्ञान यांची सांगड सांस्कृतिक मंडळ व I.S.T.E. Student's Chapter यांनी घातली ती "Our Universe" या श्री. मुकुंद मराठे यांच्या दृक् श्राव्य कार्यक्रमातून ! श्री. मराठे हे एकबहुरंगी व्यक्तिमत्व आहे. गायक असलेल्या मराठे यांना खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकरांचे मार्गदर्शन लाभले आहे. NASA तसेच नेहरु तारांगण येथून मिळालेल्या अप्रतिम Slides दाखवून श्री. मराठे यांनी हे व्याख्यान अतिशय रंजक केले.

३० जानेवारीला अंताक्षरी आणि 'One Minute Show' हे कार्यक्रम उत्साहात पार पाडले. एका मिनिटात खेळायचा आनंद सर्वांनी मनसोक्त लुटला.

वर्षाअखेरचा दिवस व स्नेहसंमेलनाचा अखेरचा दिवस ठेवला होता नाटक, नकला, खेळांची बक्षिसे व संगीत स्पर्धांसाठी !

Hawkers & Fakers हे सध्याच्या राजकारणाचे मार्मिक चित्रण दाखवणारे नाटक विद्यार्थ्यांनी सादर केले. नकला करण्याचे अप्रतिम कसब संकेत देशपांडे व नितिश ठाकूर या विद्यार्थ्यांनी दाखवले. संगीत स्पर्धांना तर उदंड प्रतिसाद होता. ४० स्पर्धकांनी यात आपली गाणी सादर केली. परिक्षक होते प्रा. अरुण जोशी व प्रा. गोडसे. विजेत्या स्पर्धांचे निकाल जाहीर होण्याआधी परिक्षक प्रा. जोशी यांनी 'डम डम डिगा डिगा' हे बहारदार गाणे गाऊन वन्स मोअर मिळवला. त्यानंतर श्री. लुकतुके, प्रा. सौ. आगाशे, ऋचा आगाशे, यांनी आपली गाणी सादर करून कार्यक्रमाचा शेवट प्राचार्य श्री. मुजुमदार, प्रा. गोडसे, प्रा. गातू, प्रा. सौ. जोशी व विद्यार्थी वर्गात अभिषेक पाळंदे, विवेक पाटील यांनी 'अंबाबाईचा गोंधळ' या गीताने केला.

सूर-तालांच्या संगतीतली ही सायंकाळ सर्वांना नक्कीच लक्षात राहिल. या सांस्कृतिक मंडळाची कामगिरी यशस्वीपणे पार पाडण्यात माझे सहकारी सौ. जोशी, सौ. इंगवले, सौ. कुलकर्णी, सौ. मराठे, सौ. गुंडाळे, श्री. गोडसे, श्री. लुकतुके, श्री. पुराणिक, श्री. विरुलकर, श्री. चांदे, सौ. मोरे, श्री. कुंवर, श्री. केरकर, श्री. विचारे व श्री. सुतावणी यांचे मोलाचे सहकार्य झाले. या सांस्कृतिक मंडळात विद्यार्थी प्रतिनिधी (G.S.) म्हणून सचिन सालेकर व विद्यार्थिनी प्रतिनिधी (L.R.) म्हणून कृतिका रामनाथन् तर सहप्रतिनिधी (A.G.S.)म्हणून प्रफुल्ल राणे, दिनेश कुंटे आणि प्रणव गद्रे यांनी अतिशय जबाबदारीने व उत्साहाने काम केले. सांस्कृतिक मंडळातर्फे सर्व वाचक वर्गाला 'नव वर्षाच्या शुभेच्छा!'

**विद्यार्थी क्रिडा प्रमुख अविनाश टाकळकर व श्री. तुषार मोहिते पाटील यांनी दिलेल्या माहिती नुसार -**

तंत्रनिकेतनातील वार्षिक क्रीडा स्पर्धा २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर १९९९ या दरम्यान आयोजित करण्यात आल्या. स्पर्धा खेळीमेळीच्या, आनंदाच्या वातावरणात पार पडल्या. विद्यार्थ्यांमधे जिद्द, चिकाटी, संघभावना इ. गुणांचा विकास व्हावा या उद्देशाने या स्पर्धा खेळवल्या जातात. यावर्षी एकूण ७ खेळ ठेवले होते. बुद्धीबळ, टे-टे, बॅडमिंटन व कॅरम हे Indoor तर व्हॉलिबॉल, क्रिकेट, कबड्डी Outdoor Games हे होते. मुलांचा या स्पर्धेसाठी खूपच चांगला प्रतिसाद लाभला. या स्पर्धा आयोजित करण्यासाठी प्राचार्य, उपप्राचार्य यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच Sports Committee व विद्यार्थ्यांनी मोलाची मदत झाली. त्याबद्दल सर्वांचे आभार.

विजेत्या उपविजेत्यांची नावे खालील प्रमाणे-

**बॅडमिंटन (Girs) Doubles**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेते | १) | रश्मी शेणॉय | TYEPS |
| | २) | आदिती चक्रवर्ती | TYEPS |
| उपविजेत्या | १) | प्रणोती शिंदे | TYIE |
| | २) | आरती गुरुनाथन | SYIS |

**बॅडमिंटन (Girls) Single**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेते | १) | रश्मी शेणॉय | TYEPS |
| उपविजेती | २) | प्रणोती शिंदे | TYIE |

**बॅडमिंटन (Boys) Doubles**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेते | १) | अनिश काणेकर | FYIE |
| | २) | रिझवान नाईकवडी | FYIE |
| उपविजेते | १) | प्रकाश जेठवानी | SYEPS |
| | २) | विजय पाठारे | SYIE |

**बॅडमिंटन (Boys) Single**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेते | १) | अनिश काणेकर | FYIE |
| उपविजेता | २) | नितेश धाग | TYCH |

**कॅरम (Girls) Doubles**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेत्या | १) | निलीमा पाटील | SYIE |
| | २) | किर्ती शौचे | SYIE |
| उपविजेत्या | १) | निराली पटेल | SYIE |
| | २) | पुनम चौधरी | TYEPS |

**कॅरम (Girls) Single**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेते | १) | निलीमा पाटील | SYIE |
| उपविजेती | २) | माधवी कांबळे | FYSS |

**कॅरम (Boys) Doubles**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेते | १) | प्रसाद पवार | TYIE |
| | २) | केदार नामजोशी | TYIE |
| उपविजेते | १) | समीर शेलार | TYIE |
| | २) | गणेश नाईक | TYIE |

**कॅरम (Boys) Single**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेता | १) | सौरभ ठोसर | SYES |
| उपविजेता | २) | निलेश नाईक | TYCH |

**टेबलटेनिस (Boys) Doubles**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेते | १) | स्वरुप जगताप | TYEPS |
| | २) | अरविंद भिलारे | TYEPS |
| उपविजेते | १) | गौरव आंग्रेटकर | TYIE |
| | २) | निलेश नाईक | TYCH |

**टेबलटेनिस (Boys) Single**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेता | १) | स्वरुप जगताप | TYEPS |
| उपविजेता | २) | निलेश नाईक | TYCH |

**बुद्धिबळ (Boys)**

| | | | |
|---|---|---|---|
| विजेता | १) | प्रशांत तावडे | FYEPS |
| उपविजेता | २) | प्रितम पाटे | TYIE |

**Outdoor Games**

**क्रिकेट**

| | |
|---|---|
| विजेता | SYEPS |
| उपविजेता | SYCH |

**व्हॉलीबॉल**

| | |
|---|---|
| विजेता | TYCH |
| उपविजेता | TYIE |

**कबड्डी**

| | |
|---|---|
| विजेता | TYEPS |
| उपविजेता | TYCH |

राजीव गांधी मेडीकल कॉलेज आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा -

बॅडमिंटन (Boys) Singles

विजेता १)आनिश काणेकर

बॅडमिंटन (Girls) Single

उपविजेती १) रश्मी शेणॉय

अभिनंदन ! अभिनंदन !

महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन मधून तंत्रनिकेतनाला अभिमान वाटावा असे पत्र आले. त्यांत इ.पी.एस्. विभागातून दोन विद्यार्थी संपूर्ण बोर्डातून एप्रिल ९९ या सत्रात प्रथम व द्वितीय आलेले आहेत.

त्या विद्यार्थ्यांचा तपशील कार्यालयातील सौ. चाफेकर यांनी पुढील प्रमाणे दिला आहे.

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक : लामखेडे दत्तात्रय तुकाराम | ७७.१७१% |
| द्वितीय क्रमांक : जयकर जयेश हरी | ७२.७८०% |

या त्यांच्या यशाबद्दल प्राचार्य मुजुमदार आणि सर्व स्टाफ तर्फे हार्दिक अभिनंदन ! या त्यांच्या यशात त्यांचे स्वतःचे अभ्यासाचे कष्ट तसेच विभाग प्रमुख सौ. वडेर यांचे मार्गदर्शन व प्राध्यापकांचे साहाय्य समाविष्ट आहे.

दिनांक १२-१-२००० रोजी स्वामी विवेकानंद जयंती तंत्रनिकेतनात साजरी केली. ऑडिओ-व्हिज्युअल हॉल मधील स्वामी विवेकानंदाच्या फोटोला प्राचार्य सी.जी. मुजुमदार यांच्या हस्ते पुष्पहार घातला. कार्यालयातील सौ. दाणी यांनी स्वामी विवेकानंद केंद्राची (कन्याकुमारी) प्रार्थना म्हटली. या वेळी सर्व स्टाफ हजर होता. श्री. गोडसे यांच्या पुढाकाराने हा समारंभ संपन्न झाला.

बांदोडकर महाविद्यालय

बांदोडकर महाविद्यालयातील 'आकांक्षा' हा स्नेहसंमेलनाचा वार्षिक कार्यक्रम व वार्षिक क्रीडास्पर्धा अतिशय उत्साहात संपन्न झाल्या. विविध गुण दर्शनातील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यासाठी विख्यात लेखक श्री. शिरीष कणेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

थोरले बाजीराव पेशवे सभागृहात विविध प्रकारच्या स्पर्धांचे कला मंडळातर्फे आयोजन करण्यात आले होते. तसेच स्पर्धा, रांगोळी, पुष्परचना स्पर्धा महाविद्यालयात आयोजित केल्या गेल्या.

प्राचार्य सी.जी. पाटील यांच्या व उपप्राचार्या डॉ. पेजावर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम संपन्न झाले. कला मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. आर्. पी. आठल्ये व त्यांचे सहकारी प्राध्यापक तसेच विद्यार्थी यांनी या 'आकांक्षा ९९' उत्सवासाठी अपार कष्ट घेतले.

येथील बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील रसायन शास्त्राची विद्यार्थिनी कु. प्राजक्ता सारंग हिने इंडियन केमिकल सोसायटीच्या मुंबई शाखेने आयोजित केलेल्या रसायन शास्त्रातील ॲपटीट्यूड परीक्षेत द्वितीय क्रमांक मिळविला.



कु. प्राजक्ता सारंग

सदर परीक्षेसाठी ८९ विद्यार्थी निवडले गेले होते. प्रथम क्रमांक आय्.आय्.टी.च्या विद्यार्थ्यास मिळाला. प्राजक्ताला या अतुलनीय यशाबद्दल खास पदक व रोख पुरस्कार मिळाला.

अतिशय मानाच्या मानल्या जाणाऱ्या या परीक्षेतील यशाबद्दल तिचे महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील व सर्व प्राध्यापक यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

येथील बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागातील प्राध्यापिका सौ. पूनम कुर्वे यांना त्यांच्या संशोधनासाठी मुंबई विद्यापीठाची पीएच्.डी. ही पदवी मिळाली आहे.



सौ. पूनम कुर्वे

पीकांवर विविध प्रकारची कीटकनाशके फवारण्यात येतात. त्यातील काही जमिनीतील पाण्यात झिरपून त्या पाण्यातून नद्या, विहिरी अशा जलाशयांमध्ये जातात. त्या कीटकनाशकांचा 'मिसोसायक्लोपल्युकारटी' या विशिष्ट प्रकारच्या प्लवंगांवर व त्याच्या पुनरुत्पादन प्रक्रियेवर परिणाम होतो. हे प्लवंग हे माशांचे खाद्य आहे. अन्नसाखळीतील या दुय्यम प्रजातीतून माशांच्या पोटात ही कीटकनाशके जातात असे मासे मानवी आहारात आल्यामुळे मानवी आरोग्यावर त्याचे दूरगामी परिणाम होतात. हा विषय प्रा. सौ. कुर्वे यांनी आपल्या संशोधनाकरिता निवडला होता.

प्रा. सौ. कुर्वे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्याच माजी विद्यार्थिनी असून या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी.व्ही. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सदर संशोधनाचे काम केले. महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य सी.जी. पाटील, प्राणिशास्त्र विभागाच्या प्रमुख व उपप्राचार्या डॉ.माधुरी पेजावर व या विभागातील प्राध्यापक सहकारी यांचे अतिशय बहुमोल सहकार्य मिळाले अशी भावना डॉ. पूनम कुर्वे यांनी व्यक्त केली.

**सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल - प्राथमिक विभाग-**

दि. १७ डिसेंबर रोजी इ. १ली व २री चे तर दि. १८ डिसेंबरला इ. ३री व ४थीचे वार्षिक स्नेहसंमेलन झाले. दोन्ही ही गटांमध्ये सगळेच कार्यक्रम अप्रतिम होते. डाव उजव करायला कुठे संधीच नव्हती, परिक्षकांबरोबर प्रेक्षक ही स्तंभित झाले होते. आजच्या स्पर्धेच्या युगात अशिक्षितांपासून ते सुशिक्षितांपर्यंत व गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत सगळ्यांनाच रोजच्या छोट्या छोट्या अडचणींना सामोरं जावं लागतं. आपण त्यामध्ये अडकून जाऊन आयुष्यातील छोट्या मोठ्या सुखांकडे दुर्लक्ष करतो अशी कल्पना असलेले 'छोडो ये छोटी छोटी बाते' हे नृत्य १ली व २री च्या मुलांनी सादर केले. ज्याला पहिल्या क्रमांकाच बक्षिस मिळालं. या नृत्याचं दिग्दर्शन रश्मी शर्मा व संजय बोरकर यांनी केलं होतं. दुसऱ्या क्रमाकांच बक्षिस मिळालं 'या या हिप्पी हिप्पी' या नृत्याला. या नृत्याचं दिग्दर्शन उषा यवगल यांच होतं. इ. १ली च्या इवल्याशा मुलांनी ज्या सफाईदार पणे गाण्याची गती व ठेका पकडला होता तो वाखाणण्या जोगा होता.

या प्रसंगी श्री. आगवण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

शिकार करायचीच तर बंदुक कशाला... कॅमेऱ्याने करा



सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल - प्राथमिक विभाग स्नेहसंमेलन पहिला क्रमांक 'छोडो ये छोटी छोटी बाते' (इ. २री)

दुसऱ्या दिवशीच्या सत्रात इ. ३री व ४थीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रमुख पाहुणे म्हणून बाल रोग तज्ञ श्री. अविनाश बागळे हे उपस्थित होते. या दिवशी सुद्धा विद्यार्थ्यांची लाजबाब अदाकारी पहाण्यास मिळाली. इ.४थी च्या 'त्योहारों की रेल गाडी' हा वर्षाच्या बारा महिन्यातील बारा सणांची झलक दाखवणाऱ्या नृत्याने प्रथम क्रमांक पटकवला. प्रत्येक सणांचे जिवंत वातावरण मुलांनी रंगमंचावर उभे केले. त्या मधे दही हंडी, गणपती, दिवाळी



सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल - प्राथमिक विभाग स्नेहसंमेलन दुसरा गट पहिला क्रमांक 'त्योहारों की रेल गाडी'

हे सण मनात ठासून गेले. मुलांनी रंगमंचावरच वेशभूषा बदलून प्रत्येक सणांमधे कधी राधाकृष्ण बनून तर कधी अष्टभुजा देवी, कधी शंकर पार्वती बनून तर कधी राक्षस बनून प्रेक्षकांना अवाक केले. या नृत्यांच दिग्दर्शन शैला सांगोली व संजय बोरकर यांनी केले होते. विशेष म्हणजे या नृत्यात सर्वाधिक म्हणजे ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

द्वितीय क्रमांक मिळवला गरबा नृत्याने. या नृत्याचे दिग्दर्शन केले होते किर्ती कटारा यांनी. या कार्यक्रमासाठी सौ. गायतोंडे, सौ. मेधा काळकुंद्रे, सौ. स्वाती टिपणीस व सौ. शिल्पा भांगले यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. एकंदरीत हा कार्यक्रम यशस्वी करण्यात सर्व शिक्षक वर्गाचे अथक परिश्रम होते.

**सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल - माध्यमिक विभाग- वार्षिक स्नेहसंमेलन वृत्तांत**

सौ. मैत्रेयी शेवडे यांनी कळवल्यानुसार -

सौ.आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. १७, १८ व १९ डिसेंबर १९९९ रोजी संपन्न झाले.

दि. १७ डिसेंबर ९९ रोजी इ. ५वी व ६वी च्या विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, संगीताचे कार्यक्रम सादर केले. प्रमुख पाहुण्या सौ. तिळवणकर यांनी आपल्या भाषणातून पालकांना संदेश दिला. त्यांनी सांगितले, आपल्या पाल्यावर अपेक्षांचे ओझे लादू नका. त्यांना ज्यात रुची असेल त्या कलागुणांसाठी त्यांना प्रोत्साहन द्या. त्यानंतर त्यांनी पारितोषिक वितरण केले.

दि. १८ डिसेंबर ९९ रोजी इ. ७वी ८वी च्या विद्यार्थ्यांनी मनोरंजन व समाज प्रबोधनाचे कार्यक्रम सादर केले. डॉ. मोहन चंदावरकर हे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी उदाहरणादाखल एका गोष्टीच्या माध्यमातून सांगितले की

विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धीला गंज चढू न देता कामा नये. सतत नवीन काहीतरी शिकण्यासाठी बुद्धीचे तेज वाढवत राहिले पाहिजे. शाळेला 'बेस्ट स्कूल' चा किताब मिळाल्याबद्दल व एकंदरच शाळेच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल त्यांनी शाळेचे कौतुक केले. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिके दिली गेली.



सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल सर्वद्वितीय मराठी एकांकीका माध्यमिक विभाग 'कथा एका धरणाची'

दि. १९ डिसेंबर १९९९ रोजी इ. ९वी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले कार्यक्रम व दि. १७ व १८ डिसेंबरच्या कार्यक्रमातील निवडक कार्यक्रम सादर केले गेले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी अहवाल वाचन केले. त्यात त्यांनी आंतरशालेय विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या घवघवीत यशाची माहिती दिली. ह्या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध साहित्यिक श्री. रविंद्र पिंगे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. त्यांनी आपल्या भाषणात पर्यटनाचे महत्व सांगितले. तसेच दूरवरच्या खेडेगावांमधे अनेक गरीब मुले अनेक गैरसोयी सोसून कशातऱ्हेने उमेदीने शिक्षण घेत आहेत त्याची माहिती दिली. व येथील शहरातील विद्यार्थ्यांनी त्यांना अनेक सोयी उपलब्ध आहेत तेव्हा खूप मेहनत करून भरघोस यश मिळवावे अशी अपेक्षा व्यक्त केली. मार्च १९९९ च्या एस्.एस्.सी. परीक्षेत गुणवत्ता यादीत चमकलेल्या शाळेच्या सौरभ चुबे ह्या विद्यार्थ्याचा त्यांची हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच इतरही काही महत्त्वाची पारितोषिके त्यांनी प्रदान केली.



सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल वार्षिक स्नेहसंमेलन -श्री. रविंद्र पिंगे, प्रमुख पाहुणे आपले विचार मांडताना.

इ. ५वी ते ७वीच्या गटातील आदर्श विद्यार्थी - स्वप्निल घोडगे. आदर्श विद्यार्थिनी-समृद्धी जोशी. इ.८वी ते १०वी च्या गटातील आदर्श विद्यार्थी-शार्दुल म्हात्रे. आदर्श विद्यार्थिनी -समिधा भसे. तसेच प्रतिष्ठेचे समजल्या जाणाऱ्या 'सौ. आनंदीबाई जोशी पदकाचे ह्या वर्षीचे मानकरी इ.५वी ते ७वी - गौतमी नेवाळकर व इ.८वी ते १०वी -मधुरा ओक हे ठरले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा व त्यांचा पाठीवर कौतुकाची थाप देणारा हा सोहळा !

शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी ह्या सर्वांच्या सहकार्याने हा सोहळा यशस्वीपणे पार पडला.

**जोशी-बेडकर कला वाणिज्य महाविद्यालय-**



**जगतसुंदरी युक्ता मुखी, मंडळाचे अध्यक्ष डॉ. बेडेकर, प्राचार्य स.वा. गोखले व मंडळाच्या इतर सदस्यांबरोबर.**

जगतसुंदरी युक्ता मुखी हिने दिनांक १४-१-२००० रोजी के.ग.जोशी कला व एन.जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयास भेट दिली. महाविद्यालय परिसरात खास वर्गातून फेरफटका मारल्यावर तिने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी दिलखुलास बातचीत केली. या वेळी तिच्या हस्ते महाविद्यालयीन रोझ क्वीन, रोझ प्रिन्सेस, रोझ प्रीन्स, रोझ किंग यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी केलेल्या औपचारिक भाषणात तिने जीवनात कोणतेही क्षेत्र निवडा, पण त्या क्षेत्रात यश मिळविण्यासाठी जीवापाड कष्ट करा असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. महाविद्यालयाच्या रोझ डे ला उपस्थित राहून जगतसुंदरी युक्ता मुखी ने त्या दिवसाची रंगत व विद्यार्थ्यांच्या उत्साहात अधिक भर पडली.

**'व्हिजन २०००' बांदोडकर महाविद्यालुयात पुस्तक प्रदर्शन**

ठाणे, दि. १६- 'व्हिजन २०००' या शिर्षकांतगर्त बाळकृष्ण नाईक बांदोडकर महाविद्यालय, ठाणे येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे चालविल्या जाणाऱ्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांद्वारे दिनांक १३ व १४ जानेवारी २००० रोजी ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.



**प्रदर्शन पहाताना प्रा. भोंजाळ, प्रा. बारसे, प्राचार्य पाटीलसर, टिल्लूसर, व डॉ. बा.ना. बेडेकर**

प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी ९ वाजता श्री. चंद्रकांत भोंजाळ, विभागीय संचालक, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. अ.धों.टिल्लू, महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील, उपप्राचार्या डॉ. सौ. पेजावर, कला-वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. बारसे इ. मान्यवर उपस्थित होते.

प्रदर्शनात सुमारे ६०० संदर्भग्रंथ ठेवण्यात आले होते. विश्वकोश, शब्दकोश, संस्कृतीकोश, चरित्रकोश, विज्ञानावरील संदर्भग्रंथ हे ग्रंथ प्रदर्शनाचे आकर्षण होते.

या प्रदर्शनासाठी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या पाच प्रकारच्या समित्यांनी काम केले. या समित्या १) ग्रंथ निवड व माहिती समिती २) सजावट समिती ३) आमंत्रण समिती ४) देखरेख समिती ५) प्रसिद्धी समिती.

या सर्व समितींद्वारे या ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले व या सर्व उपक्रमांत महाविद्यालयाच्या बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

त्या सर्व उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील व ग्रंथपाल श्री. मोहन पाठक यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कर्मचारी वर्गाने यांत अतिशय मोलाचे सहकार्य करून मार्गदर्शन केले.

•••

---

वृक्षांच्या वाढीमध्ये संस्कृतीची वाढ आहे.